# चैतन्य लहरी

सप्टेंबर/ऑक्टोबर २००३
अंक क्र. ९,१०









# अनुक्रमणिका


- नित्य हो आराधना ---------- २
- श्री गणेश पूजा : इटली १३ सप्टेंबर २००३ ---------- ३
- ऋतंभरा प्रज्ञा, लॉस एन्जिल्स, सेमिनार जुलै ८३ ---------- ५
- अमृतवाणी ---------- ९
- शिव पूजा, इटली, १७ फेब्रुवारी १९९१ ---------- १०
- गणपत्यथर्वशीर्षः भावार्थ ---------- १३
- प.पू.श्रीमाताजींच्या बरोबर ध्यान :१९८२ ---------- १५
- चैतन्य मेळा, महाराष्ट्र सेमिनार शिर्डी २००३ (वृतांत) ---------- १७
- गौतम बुध्द ---------- २०
- सहज समाचार ---------- २४


चैतन्य लहरी, सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्व्हे नंबर १८, भुसारी कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०३८
टेलिफोन : ०२०-५२८ ६१०५ chaitanyalaharipune@ rediffmail.com

# ...नित्य ही आराधना

सध्याचे दिवस धार्मिक सणवार साजरे करण्याचे आहेत. उसळत्या उत्साहाने साजरे होणारे गणेशोत्सव व नवरात्रीचे सण चैतन्यमय वातावरणात नुकतेच संपन्न झाले. पारंपारिक व त्याचबरोबर नवनवोत्मेषक स्वरूपांत हे सण दर वर्षी जल्लोषपूर्व वातावरणांत साजरे केले जातात. भक्ति आणि श्रध्दा आपल्या संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. आनंद, उल्हास, कलात्मकता, प्रदूषणाची जागरुकता, श्रध्दा इ. भावनांबरोबरच या उत्सवांमधें प्रसिध्दि, झगमगाट, शक्तिप्रदर्शन, सजावटीची व मानाची स्पर्धात्मक अहमहमिका, गर्दी व त्याबरोबर येणाऱ्या अपप्रवृत्ति या सर्वांचा विचार केला तर या भव्यतेला दिव्यत्वाचा पदरही मिळणें अधिक मंगलदायी होईल हा विचार मनांत डोकावतो.

सहजयोग्यांच्या दृष्टीनें या सणांना एक वेगळे वलय व महत्त्व आहे. आपण सहजयोगीही हे सण मानतो व पूजा करुन चैतन्याची अभिवृध्दि मिळवतो. प.पू. श्रीमाताजी या पूजाप्रसंगी नेहमींच आपल्याला मार्गदर्शन व उपदेश करत असतात. हा उपदेश अंत:करणांत खोलवर रूजवणें व त्यानुसार आपल्या व्यक्तिमत्वांत त्याचा अविष्कार घडवून आणणें हे आपणा सर्वांचे कर्तव्य व जबाबदारी आहे. सुबुध्दि, विवेक, ज्ञान, कला व शक्ति अशा सद्‌गुणांची ही पूजनीय दैवतं आपल्या अंत:करणामधें व चारित्र्यामधें अधिकाधिक जागृत व कार्यान्वित करणें यावरच श्रीमाताजी भर देत असतात.

आपल्या प्रत्यक्ष जीवनामधें व व्यवहारामधें आपण जे कांहीं करतो, बोलतो, विचार करतो व वागतो त्याचा अध्यात्म्याशी, आत्म्याशी व सहजयोग-संस्कृतीशी नेमका, कसा व किती संबंध आहे याची सतत चाचपणी करण्यासाठीं डोळसपणा, सुबुध्दि, सुजाणपणा व शक्ति देण्यासाठीं या दैवतांची आपण प्रार्थना करुं या. पावित्र्य व निरागसता आणि षड्‌रिपूंच्या सीमा ओलांडण्याची शक्ति मिळवणें हीच आपली आराधना होऊं दे. सत्याचा असत्यावर विजय होणारच आहे

●●●

# श्रीगणेश पूजा

## प.पू.श्रीमाताजींची पूजा (कबेला)

## दिनांक १३ सप्टेंबर २००३



आपल्यामधें श्रीगणेश किती जागृत आहेत हे प्रत्येकानें तपासून पाहिले पाहिजे.

(श्रीमाताजींनी लहान मुलांना पूजामंचावर येण्यास आमंत्रित केले)

आज आपल्यासमोर श्रीगणेश या मुलांच्या रुपात आले आहेत. ही मुलेच उद्या सर्व मानवजातीला उन्नतीच्या मार्गाकडे नेणार आहेत. समस्त मानवजांतीची आपल्याला काळजी घ्यायची आहे. आपण सर्व आजच्या जमान्यांतले मानव असलो तरी ही मुले भविष्यकाळाचे आदर्श मानव बनणार आहेत. हे सांगणे अवघड आहे; पण सहजयोगामुळें त्यांची वाढ चांगलीच होईल. त्यांचे वर्तन योग्य होईल आणि त्यांच्यामधूनच सगळीकडे उत्तम व उन्नत सहजयोगी दिसून येतील.

ते कार्य करण्याची जबाबदारी तुम्हां वयस्कर व प्रौढ सहजयोग्यांवर आहे व ते तुमचे कर्तव्य आहे. म्हणून त्यांच्या समोर नीतिमूल्यांचे पाठ ठेवा व आपले जीवन असे उन्नत बनवा की तुमच्या पावलावर पाऊल टाकून ही मुलेही पुढें उत्तम सहजयोगी बनतील. ही फार मोठी जबाबदारी आहे; कदाचित हे तुम्हाल समजणार नाहीं किंवा नीट ध्यानांत येणार नाहीं; पण हे सर्व लहान जीव महान पुण्यात्मे आहेत. आणि त्यांचा तसाच लक्षपूर्वक सांभाळ करायला हवा आणि तो आदर राखून फार प्रेमळपणानें व काळजी घेऊन त्यांचे संगोपन करणें अत्यंत महत्त्वाचे आहे. मोठया माणसांची हीच एक अडचण आहे की मुले ही लहानच असतात हे ओळखून त्यांच्याशी तसेच वागणें त्यांना जमत नाहीं. आपल्याला सर्व कांही समजते, त्यांच्यासाठीं वेगळा वेळ व शक्ति मुद्दाम अशी ठेवण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही.

पण आज गणेशपूजा करत असतांना श्रीगणेशच मुलांच्या रुपांत आपल्याबरोबर आहेत हे आपण लक्षांत घ्यायला हवे आणि त्यानुसार त्यांच्याशी वागले पाहिजे. म्हणजे त्यांनाही त्यांची जबाबदारी कळेल. मला असे दिसते की कांही मुलें फार सुंदर, सहजप्रवृत्तीची असतात तर कांहीं कसलेंच भान नसल्यासारखे वागतात. तीच गोष्ट मला वयस्कर सहजयोग्यांच्या युवा मुला-मुलींबरोबरच्या वागण्यामधें आढळते. सहजयोग्यांच्या परिवारमधें सगळ्या तऱ्हेचे व आचाराचे लोक असतात. अर्थात सर्वांनी शिस्तबध्द व एक छापाचे असण्याची जरुरी नाहीं; पण विविधतेमध्येही एक प्रकारची सुंदरता व एकमेकांबद्दल आपलेपणा व समरसता असली पाहिजे.

त्यासाठीं काय केले पाहिजे हे बघितले पाहिजे; विशेषत: वयस्कर सहजयोग्यांनी त्यासाठीं आपण काय केले पाहिजे हे जाणले पाहिजे. सर्वप्रथम श्रीगणेश म्हणजे काय, त्यांचे गुण व महत्त्व काय, ते दर्शवतात हे लहानांना समजावून सांगितले पाहिजे.; श्री गणेश लहान मुलासारखे असूनही इतके उदार, इतके दयाळू व क्षमाशील असतात हे त्यांच्या लक्षात आले की ते आपोआप त्यांच्यासारखे

बनत चालल्याचे तुम्हाला आढळून येईल. कांहीं मुले जन्मत:च चाणाक्ष व समजूतदार असतात तर कांहीं खट्याळ,खोडकर स्वभावाची असतात, काहींना आपण काय व कां करतो हे लक्षांत येत नाहीं. शेवटीं मुले ही मुलेच असतात.पण म्हणूनच आपण त्यांच्याकडे लक्ष ठेवून त्यांना श्रीगणेश पूर्णपणे समजावून सांगितले पाहिजेत.

मला तर वाटते की प्रत्येक घरामधें श्रीगणेशांची मूर्ति असली पाहिजे, त्याच्याकडे पाहून लहान मुलांचे कुतुहल जागृत होऊन ती विचारतील की '' हे कोण आहेत, ते काय करतात?'' मग तुम्हालाही आश्चर्य वाटेल की त्यांना लगेच समजेल की श्रीगणेशांचे गुण कोणते व ते कसे मिळवायचे. हे तुम्हा सर्वांसाठी फार आवश्यक आहे कारण त्यांतून तुम्हीं मुलांना श्रीगणेशांसारखे बनण्यास मदत करुं शकाल. श्रीगणेशांचा पावित्र्य व शुध्दता हा गुण त्यांना समजेल. हळूं हळूं त्यांच्यातील दुर्गुण कमी होत चालल्याचे तुम्हाला जाणवेल, ही सुधारणा अशीच घडून येणार आहे. त्यांना माझें भाषण कळणार नाहीं वा समजणार नाहीं; पण एवढें मात्र नक्की की त्यांच्यामधेंच कांहीं बाधा असतील तर निरागस असल्यामुळें त्यांच्यामधून त्या व्यक्त होतील. ही निरागसता असल्या बाधा लपवूं शकणार नाहीं.

मला आशा वाटते की तुम्ही तुमच्या मुलांकडे लक्ष द्याल. त्यांची काळजी घेऊन त्यांना असे मार्गदर्शन कराल की त्यांची जाणीव उन्नत होऊन त्यांचे त्यांनाच समजेल की ते कोण आहेत व त्यांनी कोणते गुण आत्मसात केले पाहिजेत. थोडी मुले अशी सुधारली की त्याचा परिणाम होऊन इतर मुलेही चांगली बनतील.

आणखी एक गोष्ट मला सांगावीशी वाटते की आपण सदैव शांतपणे बसूं शकतो म्हणजे आपली स्थिति उच्च आहे अशी स्वत:बद्दल कुणीही समजूत करुन घेऊ नये. तुमची स्थिति श्रीगणेशांचे गुण किती आत्मसात केले आहेत यावरुनच कळणार आहे. कितीतरी प्रौढ



लोकांमधेही पावित्र्य व प्रामाणिकपणासारखे गुणही अजिबात नसल्याचे मी पाहते. याला कारण म्हणजे या गुणांचे महत्त्व त्यांना कळलेले नाही. म्हणून आपल्यामध्यें श्रीगणेश किती जागृत आहेत हे पाहण्याचे काम मी तुमच्यावरच सोपवीत आहे.

लहान मुलें सदैव निरागस व मोकळ्या मनाचे असतात आणि म्हणूनच मला ती आवडतात, त्यांच्याबरोबर राहण्यांत मला आनंद होतो. त्यांच्या खोडसाळपणाबद्दल तुम्ही काळजी करुन घेऊं नका. उलट हे लक्षांत घ्या की त्यांच्याकडे तुमचे जास्त लक्ष असणेच फायद्याचे आहे; त्यांची चांगली वाढ होण्यासाठी त्यांना तुमच्या प्रेमाची व आपुलकीची ओढ आहे हे लक्षांत घ्या. मोठे होऊन ते चांगले सहजयोगी बनतील अशी मला आशा आहे. मग आपण इथें काय कार्य करत आहोत हे त्यांना समजेल. मोठ्या, प्रौढ सहजयोग्यांकडून मला अतोनात त्रास झाले. पण ही मुले तशी नाहींत; ती सरळ व गोड आहेत व त्यांना प्रेम समजते.

आतां मुलांना बाहेर जाऊन मोकळेपणानें खेळायला जाऊं द्यां. मुलांनी मला फुलें दिली तरी चालेल.

सर्वांना आनंत अशीर्वाद.



# ऋतंभरा प्रज्ञा

लॉस एन्जिल्स सेमिनार

२३.जुलै१९८३

(निर्मल योग जाने-फेब्रु.८४)

ऋतंभरा प्रज्ञा ही तुमच्या मदतीसाठी कार्यान्वित होत असते. या दैवी शक्तीचेप्रेम, संरक्षण आणि तुमच्या प्रती चित्त ह्यातून काही घटना घडत असतात.

जगाच्या निरनिराळया भागातून तुम्ही सर्वजण ह्या ठिकाणी आले आहात ते बघून मला अतिशय आनंद होत आहे. तेव्हा प्रेमाने हृदय इतके भरुन येते की शब्द त्याची तीव्रता व्यक्त करण्यास अपुरे पडतात. तुमच्या हृदयात याची तीव्रता समजावयास पाहिजे. ह्या अशा सुंदर नैसर्गिक वातावरणांत आपण एकत्र भेटत आहोत, यात मला वाटते अशी परमेश्वराची व्यवस्था आहे की याचवेळी काहीतरी वेगळे मोठे घडायचे आहे. यावेळी काहीतरी फार मोठे मिळविले पाहिजे. आता वेळ थोडा आहे. तेव्हा मी तुम्हाला ध्यानाबद्दल काही गोष्टी सांगते.

''ध्यान'' हा एक सर्वसाधारण शब्द आहे. ध्यानामध्ये ज्या तीन पायऱ्या आहेत, त्या शब्दातून स्पष्ट होत नाहीत. परंतु संस्कृत भाषेत तुम्ही ध्यानात कसे जायचे ह्या संबंधी स्पष्टपणे सांगितले आहे.

प्रथम <u>ध्यान</u> म्हटले आहे, दुसरी <u>धारणा</u> सांगितली आहे व तिसरी <u>समाधी</u>. सुदैवाने <u>सहजयोग असा आहे की तुम्हाला या सर्व गोष्टी एकत्र एका बंडलामध्ये मिळतात.</u> तुम्ही बाकी सर्व वगळून समाधीत जाता आणि हेच त्यातील सौदर्य आहे. प्रथम ध्यान घ्या. प्रथम तुम्ही जेव्हा साधक असता तेव्हा तुम्ही ज्याची पूजा करता, त्यावर तुमच चित्त ठेवता, त्याला ध्यान म्हणतात. आणि धारणा म्हणजे तुम्ही केलेले सतत प्रयत्न. तुमचे सर्व प्रयत्न त्यावरच केंद्रित करणे. परंतु जे लोक जागृत नाहीत त्यांच्या करिता हे केवळ नाटक ठरते. ते केवळ फक्त अभिनय करत असतात. परंतू तुम्हासाठी ते सत्य आहे.

तेव्हा प्रथम तुम्हाला धान केले पाहिजे. कुणी मूर्तीचे ध्यान करतात तर कुणी अमूर्ताचे करतात. परंतू तुम्ही इतके नशिबवान आहात की अमूर्त सुध्दा तुमच्या समोर प्रत्यक्षात मूर्त स्वरूपात आले आहेत. तुम्ही मूर्ताकडून अमूर्ताकडे किंवा अमूर्ताकडून मूर्ताकडे हे सर्वच येथे आहे. एका बंडलमधे . तेव्हा तुम्ही काही देवतेवर एकाग्रता करता किंवा त्या संबंधी विचार करता किंवा काही ठिकाणी निराकार की जो अमूर्त स्वरूपात करतात. किंवा सर्वस्वी निराकारावर चित्त एकाग्र करतात. जोपर्यंत तुम्ही जागृत नाही तोपर्यंत सर्व बुध्दिचा खेळ आहे. परंतु एकदा का तुम्ही जागृत झालात की तुम्ही ज्याचे ध्यान करणार आहात त्याचाच फक्त विचार करता.

पण जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीवर ध्यान करता तेव्हा तुमचं चित्त विचलित होत असत. ते जागृतीनंतरही शक्य आहे.ते एका बंडलमध्ये आहे. तरी सुध्दा काही लोक ते काही थोडे थोडे करित घेतात. तेव्हा जरी तुम्ही ध्यान करता तरी

तुमचे चित्त घटकेघटकेला विचलीत होत असते.तेव्हा किती एकाग्रचित्त होऊ शकता त्याच्यावर ते अवलंबून असत. तेव्हा मी काही असे सहजयोगी पाहिले आहेत की काही स्वयंपाक करतात तर काही ध्यान करतात. तेव्हा ध्यान करणारा म्हणतो की काहीतरी जळल्याच मला वास येतो आहे.

तेव्हा अशा ठिकाणी धारणा नसते. धार याचा अर्थ प्रवाह. प्रवाह थांबल्यास त्या ठिकाणी धारणा नाही, ध्यान आहे पण धारणा नाही. ह्यातील दुसरा भाग फार महत्वाचा आहे. तुम्हाला तुमच चित्त सतत देवतेवर ठेवावयास पाहिजे. जेव्हा तुम्ही एक स्थिति मिळविता की ज्याला धारणा म्हणतात त्यावेळी तुमच चित्त त्या देवतेशी एक होतं आणि जेव्हा हे प्रगल्भ होतं तेव्हा तुम्हाला समाधी अवस्था प्राप्त होते.

आता ज्या लोकांना असं वाटतं की जागृतीशिवाय ते हे करु शकतात तर ते पूर्णतया चूक आहे. परंतु जागृती नंतर जेव्हा तुमची धारणा प्रस्थापित होते तेव्हा तुम्हाला अशा अवस्थेत जावे लागते की ज्यामध्ये तुमची समाधे लागते. आता ही अवस्था काय आहे? जेव्हा तुम्ही या अवस्थेत असता तेव्हा तुम्ही जे काही करता, ज्या देवतेची पूजा करता ते दैवत तुम्ही एकाग्र होऊन पहाता. तुम्ही अस म्हणू शकता की जे काही तुम्ही बघता तुम्हाला तुमचे दैवतच ते करीत आहे असं दिसते. तुम्ही जे काही ऐकता, तुम्हाला तुमचे दैवतच ते सत्य सांगत आहे असे वाटते. जे काही तुम्ही वाचता त्यात तुम्हाला दिसेल की तुमच्या दैवतानेच तुम्हाला सांगितले. तेव्हा तुम्ही तुमच्या डोळ्यांनी, नाकांनी आणि इतर सर्व अवयवांनी जे काही कराल ते सर्व काही तुम्ही ज्या दैवताची पूजा करता त्याच दैवताचे दर्शन तुम्हाला आपोआप घडते, तुम्हाला आता, '' मला एकाग्रता करावयाची आहे'' असा विचार करावयास नको, ''आता मला हा विचार नको, मला आता हा विचार करायला पाहिजे,'' <u>हे सर्व काही आपोआप घडते</u>. तुम्ही एखादं पुस्तक वाचाल आणि तुम्हाला त्यात सहजयोगासाठी काय चांगलं ते सापडलं आहे. जर परमेश्वरा विरुध्द लिखाण केलेले पुस्तक असेल तर ते तुम्ही टाकून द्याल, <u>जर तुम्हाला काही अडचणी आल्या असतील तर, ते अस समजा की त्या तुम्हाला काही धडा शिकवण्याकरिता घडलेल्या आहेत</u>. (''मला काही अनुभव शिकविण्याकरीता'') ही सर्व त्या दैवतांच्या अनुभूतीची प्रचिती आहे. आता उदा.एखाद्या स्त्रीला गर्भपात होत आहे असे वाटते, तेव्हा एक व्यक्ति की जी समाधी अवस्थेला गेली नाही, किंवा संवयीचा गुलाम आहे, तो म्हणेल '' मी श्रीमाताजींसाठी एवढ केले, मी इतक्या लांब गेले आणि अस असूनसुध्दा ही अडचण मला आली'' पण दुसरा म्हणेल ''ठीक आहे मला प्रयत्न करुन बघू दे, मी जाऊन माताजींच्या फोटोसमोर सांगेन किंवा टेलिफोन करेन'' आणि त्याला असे आश्चर्य दिसेल की ते सर्व काही झालेले आहे आणि एकदम योग्य असेच आहे.

तुम्ही जर जागृत असलात तरच या गोष्टी शक्य आहेत. अन्यथा नाही. तेव्हा ही जी अवस्था तुमच्यात जागृत झाली आहे ही एक नवीन स्थिति आहे. संस्कृतमध्ये तिला सुंदर नाव आहे. फार कठीण नाव आहे.''<u>ऋतंभरा प्रज्ञा</u>'' ऋतंभरा हे निसर्गाचे नाव आहे आणि एखाद्याला तो निसर्ग प्रकाशित झालेला जाणवतो. मी तुम्हाला एक उदाहरण देते, ज्यावेळी मूल जन्माला येत असते, त्यावेळी त्याच्या आईला आपोआप दूध येते. निसर्ग मुलांच्या जन्माकरिता आपोआप कार्यान्वित होत असतो.

त्याचप्रमाणे फक्त सहजयोग्याच्या ठिकाणी ही ऋतंभरा प्रज्ञा जेव्हा कार्यरत होते तेव्हा काम कसे चटकन घडते, हे बघितलं तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. आता वेळ थोडा आहे. पण मी तुम्हाला एक उदाहरण देते, मी ब्रायटनला आले आणि जॉन्सन म्हणाला ''श्रीमाताजी ब्रायट्अनमध्ये गुरूपूजा करु या'' मी म्हटलं ठीक आहे करा. परंतू जागा शोधून काढा. तेव्हा तो युनिव्हर्सिटीत

गेला व म्हणाला युनिव्हर्सिटीचे लोक मदत करतील पण जागा लहान आहे, आणि मी म्हणाले "परंतू त्यांना विचारुन तर बघा" मग तो म्हणाला "नाही गुरुपूजेच्या दिवशी रिकामी नाही" मग मी म्हणाले दुसरे कुठेतरी आत्ताच्या आत्ता प्रयत्न करा. फोनवर कुणाला तरी विचारा, नंतर त्यांनी जाऊन त्यांना फोन केला आणि त्यांनी सांगितले की आमच्याकडे जागा आहे, फारच चांगली जागा आहे आणि तुम्ही ताबडतोब या. जेवायलाच या. तो लगेच तेथे गेला. त्यानंतर उत्कृष्ट जेवण केले. ते सर्वजण खूप आनंदी होते. ते सर्वांनाच जागा देणार होते. ते फारच चांगले लोक होते, आणि ह्या सर्व गोष्टी इतक्या चांगल्या रितीने कशा घडल्या याचे त्याला आश्चर्य वाटले.

तेव्हा ऋतंभरा प्रज्ञा ही तुमच्या मदतीसाठी कार्यान्वित होत असते. तुम्ही सर्व मला सांगता की श्रीमाताजी हे आश्चर्य घडले, ते घडले आणि आम्हाला समजले नाही की ते कसे घडले. मी एक उदाहरण देते. काल आम्ही काहीतरी सिमेंटचे काम करीत होतो. तेव्हा इटालियन मुलगा म्हणाला की आपल्याला, आणखी दोन पिशव्या सिमेंट लागेल. मी म्हणाले तू काम चालू ठेव ते संपणार नाही. मी जाण्याच्या अगोदर सुध्दा ते काम चालू होतं आणि सिमेंट संपले नव्हते. आता बघा एवढी सिमेंटसारखी गोष्ट.

तेव्हा ही एक विशेष गोष्ट आहे की निसर्ग तुमच्याशी एकरुप झाला व तुम्ही निसर्गाशी एकरुप - तेव्हा या दैवी शक्तीचे प्रेम, संरक्षण आणि तुमच्या प्रती चित्त ह्यातून काही घटना घडतात. जी काही परिस्थिती निर्माण होते, त्यातून प्रदर्शित होत आणि ह्याला अंत नाही. पण तीच समाधीची स्थिती आहे. परंतु असे काही लोक असतील की मी जर त्यांना विचारलं की तुम्ही हे कराल का ? ते म्हणतील श्रीमाताजी आता दुकान बंद झाली असतील. ते काही बराबर नाही. ते करणार नाही. अशा तऱ्हेने ते सांगत रहातील आणि काही असेही लोक आहेत की ते म्हणतील



नाही. मला बघू द्या. जर श्रीमाताजी म्हणत आहेत तर ते होईलच.

मी आता अगदी साधे उदाहरण देते. फारच बाह्यातले आहे. पण ते सत्य आहे. श्री श्रीवास्तवसाहेब हे काही विशिष्ट प्रकारचाच चहा घेतात. फारच इंग्लिश. आणि त्यांना दुसरा चहा आवडत नाही. तेव्हा ते मला म्हणाले अरे बापरे! आपला चहा संपला आणि उद्या सकाळी काय करायचे. तेव्हा मी म्हणाले ठीक आहे. चला आपण चहाच्या दुकानात जाऊ. तेव्हा ते म्हणाले आता रात्रीचे आठ वाजले आहेत. ते सर्व आपल्याला हसतील. व आता रात्री आठ वाजता कुठलेही टी सेंटरचे दुकान उघडे नसेल. मी म्हणाले बघू तर जाऊन, त्यात अडचण काय आहे. मी म्हणते चला जाऊ या. परंतू ते म्हणाले काय विचित्र गोष्ट तुम्ही सांगत आहात. मी म्हणाले ठीक

आहे. विचित्र किंवा काहीही असो. चला तर खरं. परंतु ते ऐकेनात. तेव्हा मी ड्रायव्हरला सांगितले चला आपण तिकडे गाडीने जाऊया. आम्ही तेथे गेलो आणि सर्व दिवे लागलेले होते. आम्ही म्हणालो हे दिवे कसे लागलेले आहेत? तेव्हा आम्ही आत गेलो, फारच ओशाळलेले ते सर्वजण उभे होते. '' आम्ही सर्वजण आपल्यासाठी केव्हाची वाट पहात आहोत आणि तुम्ही सर्वात शेवटी आलात''पहा कल्पना करा. पुढे म्हणाले, '' काही हरकत नाही. तुम्ही प्रेझेन्टस घ्या''. तेव्हा त्यांनी प्रत्येकी दोन चहाचे डबे प्रेझेन्ट दिले.

माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की अशी हजारो उदाहरणे देता येतील. आजच कुणीतरी पलंग सरकविण्याचा प्रयत्न करीत होते. ''मी फक्त माझी नाभी तेथे लावली, मी काही ढकलले नाही. तो तसाच पुढे सरकला ते केवळ ऋतंभरा प्रज्ञेमुळे. परंतु हा काही चमत्कार नाही. हे ईश्वराचे तुमच्यावरील प्रेम प्रदर्शित करणे. तुम्हाला, तुम्ही कोणी खास निवडलेले आहात, हे दाखविण्यासाठी आहे, परंतु ही परिस्थिती तुम्ही मान्य केली पाहिजे.

पण तुम्ही जर सर्वसाधारण लोकांसारखे वागलात की '' अरे देवा, दुकाने बंद असतील, तो माणूस विचित्र आहे, मला वाटत नाही की ते काम होईल'' तेव्हा ते कधीच होणार नाही. पण तुम्हाला हे समजले पाहिजे की निराकार व साकार अशा मी तुम्हाला जन्म दिलेला आहे, तुम्ही निवडलेले साधूसंत आहात. तेव्हा ही प्रज्ञा प्रदर्शित होत असते. प्रत्येक क्षणाला प्रदर्शित होत असते. तुम्ही तयारीत रहा. आनंदी रहा आणि तिचे स्वागत करा. आणि विश्वास ठेवा की तुम्ही जिथं आहात त्याची पातळी वेगळी आहे.

आता वेळ झालेली आहे की सहजयोग्यांनी आपली पातळी बदलली पाहिजे. आपण बदललं पाहिजे. आपण आपली उन्नती केली पाहिजे. पातळी उंचावली पाहिजे. परंतु सहजयोग असं काही संमिश्रण आहे की एकाच प्लेटवर आपल्याकडे अत्यंत खराब अशा भूता पासून अगदी वरच्या दर्जाचे लोक आहेत. आता काही जण गेले आहेत. फार अहंकारी असतात. ते सारखे गडगडत असतात. आपल्याला समजत नाही की ही प्लेट उंचवायावी कशी? जर तुम्ही ती प्लेट उंचावली तर ते गडगडत खालीयेतील.

तेव्हा तुम्ही घाबरलेले आहात. तुम्हाला त्यांना धरुन ठेवलं पाहिजे. आणि काही असे आहेत की ते विस्तृत आहेत व दुसऱ्यांच्या समस्या भुताप्रमाने आपल्या डोक्यावर घेतात. जर तुम्ही त्यांची उन्नती करण्याचा प्रयत्न कराल तर ते खाली घसरत येतील किंवा सर्व भूते पडतील. परमेश्वराला माहित पण तिसऱ्या प्रकारचे लोक आहेत, मनोऱ्यासारखे जे अगदी चांगल्या रितीने स्थिर झालेले आहेत. तुम्ही ज्या उंचीवर त्यांना न्याल तेथेच ते टिकून राहतील.

जे लोक अजून काठावर आहेत ते मला नक्कीच त्रासदायक आहेत. कारण माझ्या प्रेमामुळे मी त्यांना बाहेर फेकू शकत नाही आणि आपल्याला त्यांना मदत करावयास पाहिजे. त्यांची उन्नती करावयास पाहिजे. खरे पहाता त्यांना त्यातून बाहेर यावयास पाहिजे. आपण त्यांच्यासाठी किती वाट पहायची. म्हणजे ते सहजयोगातून बाहेर जाणार नाहीत. जिव्हाळा ठीक आहे. पण आपली सहजयोगाची पातळी खाली घसरुन चालणार नाही. कधीच नाही.

जे लोक सहजयोगात चांगले प्रस्थापित झाले आहेत त्यांची पातळी उंचावयास पाहिजे. तेव्हा प्रत्येकाने किमान पातळीपर्यंत येण्याचे व स्थिर करण्याचे प्रयत्न करावे. नाहीतर मला सांगण्यास खेद वाटतो की ते चाळणीतून गळले जातील.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

●●●

# अमृतवाणी

ध्यानामधूननिर्विचारता मिळवून त्यापुढच्या निर्विकल्प स्थितीपर्यंत पोचण्यावर प.पू.श्रीमाताजींनी अनेक प्रवचनांमधून भर दिला आहे. त्यांच्या याबाबतीतील उपदेशांमधील काहीं वचने :-

............... निर्विकल्प स्थिति गाठण्यावाचून सहजयोग्यांना तरणोपाय नाहीं, आत्मसाक्षात्कार न मिळालेल्या लोकांची गोष्ट सोडून द्या. त्यांना शिक्षा मिळणारच आहे. पण सहजयोग मिळवूनही जे निर्विकल्प स्थितीपर्यंत पोचलेले नाहीं त्यांनाही परमेश्वरी साम्राज्यांत प्रवेश मिळणार नाहीं. (ऑस्ट्रिया : मे १९८५)

...............स्वत:बद्दल आत्मविश्वास नसेल तर पूर्ण शरणागति- शक्ति मिळण्यास अवघड जाते. संपूर्ण शरणागतीनंतरच सहस्रार उघडते व त्या स्थितीमधें टिकून राहिल्यावर निर्विकल्प स्थिति मिळते. ध्यानामधें सातत्यानें अभ्यासपूर्वक प्रयत्न केल्यानें हे प्राप्त होते. (ऑस्ट्रिया : मे १९८५)

...............निर्विकल्प स्थितीमधें सामूहिक चेतना अधिकाधिक सूक्ष्म होत जाते. त्यावेळीं सत्याची सुस्पष्ट जाणीव होत असल्यामुळें घटना वा वस्तूचे पूर्ण अंतरंग समजून येते. कुण्डलिनीचे कार्य, तिची शक्ति व कार्यप्रणाली नीट समजून येते आणि तुमच्या हांतावर त्याची प्रचीति पण तुम्हाला मिळते. त्यामुळेच तुम्ही दुसऱ्यांची कुण्डलिनी जागृत करु शकता व तिच्या उत्थानमार्गातील त्यांचे अडथळे दूर करुं शकता. (नवी दिल्ली : फेब्रु १९७७)

...............खऱ्या अर्थाने निर्विकल्पतेत येण्यासाठी सहजयोग्यांना प्रथम स्वत:बद्दल पूर्ण आत्मविश्वास हवा. निर्विकल्प ही एक स्थिति आहे, मिळवण्यसारखी अशी ती वस्तू नव्हे; म्हणजे त्या स्थितीमधें तुम्ही उतरता, तो एक तुमचा सहजभाव असतो. ही सूज्ञतेची खूण आहे. (ईस्टर पूजा; रोम : एप्रिल १९९२)

...............सहजयोगाच्या प्रगतीच्या पायऱ्या असतात.या निर्विकल्प पायरीवर आलात कीं तुम्हाला पूर्ण शक्ति मिळते आणि तुमची शक्ति तुम्ही स्वत:च ओळखूं शकता. त्या स्थितीमधें स्वत:ला जाणल्यावर तुम्ही एकरुप होऊन पाहता व जे जाणवते त्याबद्दल अंधूकशी शंकासुध्दां उरत नाहीं. (ईस्टर पूजा; रोम : एप्रिल १९९२)

...............ही स्थिति येत नाहीं तोपर्यंत साधकाला सतत तळमळ वाटते. ही स्थिति मिळाल्यावर ती टिकवून ठेऊन त्याचा उपयोग केला पाहिजे; नाहीं तर श्रध्दा कमजोर होते आणि स्थिति राखणे कठीण जाते. (न्यूयॉर्क : आक्टोबर ९४ )

...............ही स्थिति ध्यानामधूनच मिळणार आहे. त्या स्थितीमधें तुमची जाणीव व चक्रांचे ज्ञान अचूक होते. समजा विशुध्दि चक्रावर त्रास वाटला तर त्याबद्दल तुम्ही खात्रीपूर्वक सांगू शकता, कसलीही शंका नसते.तसे झाले तरच निर्विकल्प झालो असे म्हणता येईल. (नवी दिल्ली : ४ फेब्रुवारी ८३)

...............पहिली स्थिती म्हणजे निर्विचारता. ही पाण्यात पडल्यावर बोटीचा आधार मिळावा अशी असते. या पुढच्या स्थितीमधें तुमची जाणीव परिपक्व व परिपूर्ण होते; त्यात तिळमात्र शंका रहात नाहीं. यालाच निर्विकल्प म्हणतात. तेव्हांच तुम्ही स्वत:ला व इतरांनाही पूर्णपणें ओळखता. (फिलाडेल्फिया : ऑक्टोबर ८३)



# शिव पूजा

इटली दिनांक १७ फेब्रुवारी १९९१ प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचेभाषण (सारांष)

हृदय पूर्णपणें उघडल्यावरच तुम्ही प्रेम,सत्य व ज्ञानाच्या सागरांत उतरून श्रीशिवांना समजूंशकता.

श्री शिव अर्थात आत्मा स्वरुपात आपल्या अंतरातील श्री सदाशिवांची पूजा करण्यासाठी आपण जमलो आहोत. आत्मतत्त्वाला प्राप्त होणे हेच आपल्या जीवनाचे ध्येय आहे.प्राचीन कालात आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी शरीराला कष्ट व यातना घेण्यास सांगितले जाई. निर्वाण प्राप्तिशिवायच शरीराच्या दुर्बल व विकलांग अवस्थेतच त्यांच्या जीवनाचा शेवट होई.

निर्वाण प्राप्तीचा एक भाग म्हणून इंद्रियसुखाच्या अधीन झालेल्या मनाचा विचार करणे हा एक प्रकार असे.मनाच्या कुठल्याही गोष्टीला पुरावा देणे 'नेति' म्हणत. परंतु सहजयोग याच्या उलट आहे, जसे प्रथम कळस चढवायचा मग पाया रचायचा. सर्वप्रथम सहस्रार उघडायचे व त्या प्रकाशात स्वत:ला पहायचे. हळू हळू चैतन्यलहरींची जाणीव वाढते व मग समजू लागते की मला याची आवश्यकता का? आपले मन सुख चैन, खाणे पिणे आणि मोठया आकांक्षा यातच का अडकते? तेव्हां <u>आपण इतरांचे दोष न बघता आपल्या आत डोकवावे कारण आपल्याला आपले उत्थान घडवायचे आहे.</u>

हृदय हे आत्म्याचे मंदीर आहे, तेच शिवाचे स्थान आहे.इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन नाडयांविषयी तुम्ही सर्व जाणता. पण हृदयाच्या चार नाड्या आहेत. एक नाडी मूलाधारकडे जाते. मूलाधाराच्या सीमा तुम्ही सोडल्या तर ती नरकाकडे जाते. या कारणे शिवांना 'ध्वंसक' (महाकाल) संबोधतात. आपणच आपल्या विनाशाला आमंत्रित करतो. फळ धरल्यावर फुलांच्या पाकळ्या आपोआप विखुरतात.मी अशा 'मीपणा व भ्रांती'व अनेक बंधनांना दूर करते. सौंदर्याच्या उदयासाठी यांचा नाश आवश्यक आहे. एक सीमा ओलांडून मर्यादांचे उल्लघन करुन आपणच आपला विनाश ओढून घेतो. या चार नाडयांच्या चार दिशांना विनाश उभा आहे. नरकाकडे जाणाऱ्या या पहिल्या नाडीपासून आपला विनाश कसा थांबवता येईल हे बघू.

निष्कपटता हा एक शिवांचा गुण आहे. एखाद्या बालकासारखे ते अबोध आहेत. त्यांच्यात अबोधिता साकारलेली आहे. वैयक्तिक गोष्टींना आपण अबोधिततेच्या सागरात बुडविल्या पाहिजेत. अबोधितेला समजून महत्व जाणून त्याचा आनंद घेतला पाहिज. पशु आणि मुले अबोध असतात. या सर्व गोष्टीवर आपले लक्ष हवे. रस्त्याने जाताना आपली दृष्टि कोठे असावी? जमिनीपासून तीन फूटाच्यावर आपली दृष्टि नसावी. यामुळे फुले, हिरवे गवत व मुलेच दिसतील. तीन फुटांच्या पेक्षा

वर इतर लोकांकडे बघण्याची जरुरी नाही. जी व्यक्ती अबोध नाही त्यांच्या डोळ्यात पाहू नये, पायापर्यंत पाहू शकता. अशी इच्छा तुमच्या अबोधितेत लीन व्हावी.मूलाधार हे अबोधिता आहे. पवित्र व धर्मपरायणता आहे . हा श्रीगणेशांचा गुण आहे. अशा स्थितीला तुम्ही बालक जरी नसला तरी तुम्ही अबोध असता. एकदा श्रीकृष्णांच्या सोळा हजार व पाच पत्नींनी एका प्रसिध्द महात्म्याला भेटायचे ठरवले. नदी पार करुन जाणे आवश्यक होते पण नदीला पूर आला होता. म्हणून ते कृष्णाकडे आले व नदी कशी पार करावयाची याबद्दल विचारले.त्यांनी सांगितले की नदीला सांगा श्रीकृष्ण योगेश्वर आहे व ब्रह्मचारीही आहे. मग पाणी ओसरेल. त्यांनी तसे केल्यावर पाणी ओसरले व त्या नदी पार करुन त्या महात्म्याकडे गेल्या व त्यांची पूजा वगैरे केली. परत फिरल्या तर नदी ओसंडून वाहत होती.म्हणून परत त्या सर्व महात्म्याकडे गेल्या. त्यांनी त्यांना श्रीकृष्णा विषयी सांगितले. त्या कथा आत्मा? मग त्यांनी सांगितले की नदीला सांगा की मी काहीच खाल्ले नाही ते ऐकून, त्यांना अचंबा वाटला. की यांना तर आपण भरपूर खायला घातले. तरी जाऊन त्यांनी नदीला तसे सांगितले व तिने त्यांना वाट करुन दिली. म्हणून संसारात पति-पत्नी संबंध असूनही तुम्ही अबोध असू शकता, हीच पवित्रता होय.

दुसरा ( नाडी मार्ग)इच्छेचा, जो त्या व्यक्तीला विनाशाकडे नेऊ शकतो. यासाठी गौतम बुध्दांनी सांगितले होते की इच्छा - विहीनतेने माणूस म्हातारपण चिंता व रोग यापासून तो लांब राहतो. इच्छा ही कुठल्याही प्रकारची असू शकते. केवळ भौतिक नाही तर मानसिक (या स्त्रीला मी मिळवणारच इ.) हे मोह वाढवणारे आहेच पण ईर्षापण कारणीभूत असते. आकांक्षा वाढतच जातात. पण मनुष्य कधीच संतुष्ट व समाधानी असू शकत नाही.याचे कारण काय तर या तुमच्या इच्छा शुध्द नाहीत. या अशाच वाढत गेल्या तर तुम्ही स्वत: हिटलर किंवा सद्दाम हुसेन सारखे व्हाल.दुसऱ्यावर प्रभुत्व गाजवणे हाही त्या इच्छेचा भाग आहे. अशा या समाधान न देण्याऱ्या आनंदहीन असणाऱ्या ईर्षा तुम्हाला विनाशाकडे ओढतात. उदा. मला एक साडी घ्यावयाची आहे. अशा क्षुद्र गोष्टीमुळेही आपले मन कुलषित विचलीत होऊ शकते. तो मी कशी मिळविणार ? सर्व चित्त तेथेच. आत्मशक्ती वाढवायची असेल तर आत्म्याचा आनंद घेता आला पाहिजे.

चित्ताची अबोधिता गमावली तर तुम्ही अशांत होता. इच्छेबरोबर तुमची सौंदर्यदृष्टी वाढली पाहिजे. समजा एखादी वस्तु ही साधारण, साधी व मशीनने बनविलेली आहे पण ती शिवजीकडे असती तर ती त्यांनी अधिक सुंदर बनविली असती. श्री ब्रम्हदेवद्धारा निर्मित आणि विष्णूनी विकास केलेल्या प्रत्येक वस्तुला सौंदर्य प्रदान करणे हा शिवांचा गुण होय. सौंदर्य संवेदनेच्या निर्मितेचे हे सूक्ष्म कार्य श्री शिवाचेच आहे. माझ्या फोटोत प्रकाश इ. जे दिसते ते शिवांचेच कार्य आहे. त्यामुळे ते तुम्हाला विश्वास देतात. हाताने बनविलेल्या वा इतर सुंदर वस्तूंकडे तुमची इच्छा गेली की त्यातील चैतन्य लहरी हळू हळू तुम्ही जाणू शकता. अशा वस्तूतून नेहमीच चैतन्य प्रवाह वाहत असते.

चैतन्यलहरींचा आनंद घेण्यासाठी शुध्द इच्छा असणे आवश्यक आहे. चैतन्य लहरींशी लीन होता होता तुमच्या नीरस इच्छाही शुध्द होतात. त्यानंतर तुम्ही केवळ चैतन्याचीच इच्छा धरता.चैतन्य लहरी नसलेल्या वस्तु तुम्ही खरेदी करणारच नाही.सर्व इच्छांचा शेवट चैतन्यामध्ये होतो. भक्तीचा आनंद ही सुध्दा शिवांचीच देणगी आहे.चैतन्याचा अर्थ आहे भक्तीरस. त्यात नीरसतेला जागा नाही. परमात्मा- स्वरुपातला प्रेमाचा सागर म्हणजेच भक्ती होय. त्यात तुम्ही अगदी डुंबून जाता. हा आनंद शब्दातून कधीच व्यक्त करता येत नाही. आपल्या आत्म्याशी संबंध हा जणू आपल्या मातापित्यासारखाच, ज्यात काही अंतर नसते. त्या सागरात तुम्ही पूर्ण बुडून जाता. तुम्हीच थेंब असता

आणि सागरही बनता. ही तुमचीच भक्ती आहे. ती भक्ती खोटी नसते. मी मानवनिर्मित नाही. श्रीशिव आपले जीवन भक्तीने भरुन टाकतात.हाच सहजयोगातील आनंद आहे. आमची प्रत्येक कृति आनंदाने भारुन टाकली जाते, त्यातून परमात्म्याचे आमच्यावर किती प्रेम आहे, हे त्या आनंदातून प्रतीत होते. मीपणा व इतर बंधने आपोआप दूर होतात.

तिसरी नाडी तुमच्यात मोहाचा (ममत्व) अनुभव देते. सगळे काही माझे, माझा मुलगा, माझे पति, परिवार, पत्नि माता पिता इ. काहींना मुलाविषयी एवढे प्रेम की त्याला अगदी लाडावून ठेवतात आणि एक दिवशी अचानक जाणवते की तो अगदी वाह्यात बनला आहे. तो आपल्या मातापित्यांना उलटे बोलतो, अनादर करतो. कधी कधी हातही उगारतो. आपण स्वतःलाच प्रश्न विचारला पाहिजे 'या मुलाची मी खरोखर प्रेमपूर्वक काळजी घेतो ? मी माझ्या पत्नीकरिता काय काय केले पण तीसुध्दा माझ्याशी तशीच वागते? हे सगळे का करायचे? याची आवश्यकता नाही. आणि जरी केले तरी ते विसरून जा. काही सहजयोग्यासाठी मीही बरेच काही केले पण तरी त्यांचे पतन झाले. अशांचा 'केवळ ईश्वरच जाणे त्यांचा कसा अंत होणार ?'असे मला वाटू लागते. ते नर्कात जाणार ? काय होणार त्यांचे! याचीच मला काळजी वाटू लागते. ते जर वाईट मार्गाला लागले तर त्यांच्या हृदयातून ती पुन्हा आज्ञामार्गातून वर जाते. तिच्या चार पाकळ्या आहेत. त्याच तुम्हाला 'तुरिया' अवस्था देतात. स्थिती तीन आहेत निद्रावस्थेत- काही सुंदर सूचना मिळतात.जेव्हा मी इटलीत जाते तेव्हां सुषुप्त अवस्थेत तेथील लोकांना मी आल्याचे समजते. 'तुरिया' ही चवथी निर्विचार समाधीची अवस्था होय. निर्विचारतेत आपण अबोध असता. या अवस्थेतच तुमच्या लहरी वाहतात. निर्विचारतेत तुम्ही कुठल्या एका व्यक्तीची लिप्त असू शकत नाही. अशा निर्विचार 'तुरिया' स्थितीत तुम्ही आलेले असता. अशा अवस्थेत तुम्ही राहिला तर या चार पाकळ्या तुमच्या मस्तकात उघडतात.त्या तुमच्या हृदयातून मस्तकात येतात तेव्हा ईश्वराविषयीचे तुम्हाला ज्ञान होते. परमात्म्याची पूर्ण ओळख होते. ती खरी वेळ ज्यावेळी तुम्हांला शुध्द ज्ञान प्राप्त होते. या चार पाकळ्या उघडल्या नाही तर तुम्ही अज्ञानातच असता. समजले पाहिजे की या आपल्या हृदयातून मस्तकात येतात. सौदर्यलहरी मध्ये शंकराचार्यांनी आपल्या पुस्तकात परमात्म्याला चेतन किंवा चेतनामय म्हटले. एका दुष्ट माणसाने त्यांच्याशी व्यर्थ वाद घातला. अशा वादविवादाला व्यर्थ समजून त्यांनी आपल्या सौदर्यलहरीमध्ये आईच्या प्रशंसाचीच रचना केली. ईश्वरी साक्षात्कारानंतर कुठल्याही गोष्टीबद्दलचे विश्लेषण किंवा त्याविषयी शंका तुम्ही घेऊ शकत नाही. सर्व शक्तिमान परमात्मा सर्व जाणतो.सर्व काही करतो व सर्व गोष्टींचा आनंद घेतो, हेच वास्तव व सत्य ज्ञान आहे.

चक्र, कुंडलिनी आणि चैतन्यलहरींचे ज्ञान म्हणजेच शुध्द विद्या नाही. सर्व शक्तीमान परमात्म्याचे ज्ञान हीच शुध्द विद्या आहे. ते बौध्दिक ज्ञान नाही. हृदयातून ते मस्तकाकडे जाते. असे ज्ञान जे आनंदाची अनुभूती दिल्यावर तुमच्या मस्तकाला व्यापून टाकते. मग तुमचे डोके त्याला नाकारु शकत नाही. जसे आईला प्राप्त करुन तिचे प्रेम तुम्ही जाणता. त्याची तुम्ही व्याख्या करु शकत नाही. त्याचा उदय तुमच्या हृदयात होतो. परमात्म्याचे ज्ञान हेच प्रेम आहे,सत्य आहे, सर्वज्ञ आहे. आपल्या अस्तित्वाची पूर्णता अर्थात जीवनाचा शेवटपर्यंत अंग प्रत्यंग होऊन राहते. म्हणून तुमचे हृदय उघडले पाहिजे. कारण त्याची सुरवात मस्तकातून नसते. चैतन्यलहरीद्वारे दुसऱ्याला न पहाता स्वतःला पहा. महामाया म्हणा किंवा आणखी काही. आईचे वर्णन शब्दांच्या पलिकडे आहे. परमात्मा सर्वशक्तीमान आहे. या प्रेमाच्या सागरात तुम्ही स्वतःला सुरक्षित समजता हेच सुंदर समर्पण आहे. अशा अवस्थेला प्राप्त व्हा हीच माझी इच्छा आहे

# ।। श्री गणपत्यथर्वशीर्ष ।।



(अंक क्र. २००३; ७-८ वरून पुढे)

गणपतीचे परब्रह्म स्वरुप व त्याची साधक म्हणून करावयाची प्रार्थना हे विवेचन या आधीं झाले आहे. आतां परब्रह्मस्वरुप गणपतीचे गुणवर्णन अथर्वणऋषी पुढील मंत्रात करतात.

मंत्र :- त्वं वाङ्मय : । त्वं चिन्मय : । त्वमानंदमय : । त्वं बह्ममय:। त्वं सच्चिदानंदाद्धितीयोसि त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि'त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसि ।

(भावार्थानुसार शब्द फोडून मंत्र सुटे करुन लिहिले आहेत)

अर्थ :- तूं वाणीचा सागर आहेस, तूं चित्सागर आहेस. तूं आनंद सागर आहेस, तूं ब्रह्मशक्तीचा सागर आहेस, तूं अद्धितीय सच्चिदानंद आहेस; तूं प्रत्यक्ष परब्रह्म आहेस, तूं ज्ञान-विज्ञानाचा सागर आहेस.

भावार्थ : 'मय' हा प्रत्यय वस्तूवाचक शब्दापुढें लावला की ' त्या वस्तूनें ओतप्रोत भरलेला' असा भावार्थ होतो. म्हणून 'मय' हा शब्द वारंवार आला आहे. म्हणूनच तो भाव दर्शवण्यासाठीं 'सागर' हा अपरिमित असे विशेषण दर्शवणारा या अर्थाचा शब्द वर घेतला आहे.

'त्वं वाङ्मय:' - 'वाक्' म्हणजे आवाज, शब्द , वाणी वगैरे. परा, पश्यंति, मध्यमा व वैखरी अशी वाणीची सूक्ष्म ते स्थूल अशी रुपें आहेत. प्रत्येक मानव वाक् - संपन्न असतोच. वाणी ही देवाची देणगी मानली जाते, अर्थात ती अगाध संपदा देवाजवळ असणारच. म्हणून गणपतीला 'वाणीचा सागर' असे संबोधले आहे. वाणी आकाश-लहरींच्या माध्यमांतून सर्वत्र पोचते, अर्थात 'वाक्' हे अतिसूक्ष्म 'सत् 'चेच स्थूलरुप आहे ह्याचा निर्देश या उपमंत्रातून केला आहे.

'त्वं चिन्मय: ' - प्रत्येकाच्या ठिकाणी (वस्तूमात्रामधें) चैतन्य असतेच.चित् म्हणजे चेतना, चेतस्, बोध इ. परब्रह्म चैतन्याचा स्त्रोत असल्यामुळें परब्रह्म- स्वरुप गणपतीला ''चैतन्याचा सागर'' म्हणणें ओघानेंच येते.

'त्वं आनंदमय :' - या उपमंत्रातील 'आनंद' हा शब्द सोपा दिसला तरी त्याच्यांत खोल अध्यात्मिक भावार्थ दडलेला आहे. व्यवहारांत वापरतात तसा अर्थ वेदान्तात वापरत नाहींत, त्याचा निर्देश 'ब्रह्मानंद' (निर्भेळ चिरस्थायी आनंद) असा समजला जातो. त्याला कांही कारण लागत नाहीं व त्याला प्रतिद्धंदी (विरुध्द अर्थाचा)शब्दच नाहीं. श्रीगणेश हे अशा आनंदाचे बिरुद आहेत. म्हणूनच त्या आनंदाचे ते सागर आहेत.

'त्वं ब्रह्ममय : - वरील सर्व भाव एकत्रितपणें आणि ओतप्रोत भरुन असलेली वस्तू परब्रह्मच असली पाहिजे; अर्थात परब्रह्मस्वरुप गणपति हा त्या महान 'ब्रह्मशक्तीचा सागर ' आहे हा भाव योग्यच आहे.

'त्वं सच्चिदानंदाद्धितीयोसी' - वरील चार उपमंत्रांचा निष्कर्ष असा हा उपमंत्र आहे. विश्वाच्या गोचर व अगोचर अफाट पसाऱ्याच्या मुळाशी असलेले अविनाशी तत्त्व म्हणजे 'सत्' आणि सर्वव्यापी जाणीवेचा महासागर

म्हणजे 'चित्' आणि या दोन सूक्ष्मतत्त्वांतून होणारी निर्मिति हा आनंद असे जे सत् - चित् - आनंद हेच अद्वितीय असे परब्रह्म एवढा व्यापक भाव या उपमंत्रात सामावलेला आहे.

'त्वं प्रत्यक्ष ब्रह्मासि'- वरील सर्व गुण सामावलेले एकमेव सत्य अर्थात परब्रह्म गणपतिरुपांत अवतरल्यामुळे 'तूं प्रत्यक्ष दिसणारे ब्रह्म आहेस' असा समारोप अथर्वणऋषी करतात.

'त्वं ज्ञानविज्ञानमयोसि' - क्षेत्रक्षेत्रज्ञज्ञान, व्यष्टि-समष्टि ज्ञान, परोक्ष-अपरोक्ष ज्ञान, क्षराक्षर ज्ञान इ. अनेक व्याख्यांमधून शास्त्रांमधें या विषयाचा उल्लेख आढळतो.त्यांच्या तात्त्विक भागांत न शिरता, सामान्य साधकांसाठीं ''जाणीव जेथे न दिसे। विचार मागुता पाऊली रिघे। तया नांव ज्ञान। प्रपंचू हे विज्ञान। तेथे सत्यबुध्दि ते अज्ञान॥''ह्या ज्ञानेश्वरांच्या ओवी या संदर्भात पुरेशा आहेत. ' तूं ब्रह्मविद्येचा सागर आहेस' हाच या उपमंत्राचा भावार्थ. हेच प्रपंच-ज्ञान पुढील मंत्रात आहे.

मंत्र : सर्व जगदिदं त्वत्तो जायते। सर्व जगदिदं त्वत्तस्तिष्ठति।सर्व जगदिदं त्वयि लयमेष्यति। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति। त्वं भूमिरापोनलोनिलोनभः। त्वं चत्वारि वाक्पदानि॥

अर्थ :- हे सर्व जग तुझ्यापासून उत्पन्न होते, हे सर्व जग तुझ्या आधारावरच टिकून राहते, हे सर्व जग तुझ्या ठिकाणींच लय पावणार आहे, हे सर्व जग तुझ्याकडेच येत आहे. पृथ्वी, पाणी, तेज, (अग्नि), वायु व आकाश (ही पंचमहाभूते)तूंच आहेस;चारी वाक्-रुपें तूंच आहेस.

भावार्थ :- या आधींच्या 'त्वमेव प्रत्यक्षं......खल्विदं ब्रह्मासि' या मंत्रांचेच वरील मंत्रात सुलभीकरण असल्यामुळें ''ब्रह्मन् सत्यम् जगत् मिथ्या' ह्या आदिशंकराचार्यांच्या वचनांतून त्याचा भावार्थ समजण्यासारखा आहे. थोडक्यांत स्पष्टीकरण पुरेसे व्हावे.

समस्त नामरूपात्मक सृष्टि 'सत्' या अधिष्ठानावरील आरोप असून त्यालाच व्यावहारिक भाषेत निर्माण झाली असे आपण समजतो. रज्जू-सर्प न्यायानुसार 'हे गणपते, हे सर्व जग तुझ्यापासून उत्पन्न होते' असे इथें म्हटले आहे. तसेच सर्पाचा भास होण्यास जसा रज्जूचा आधार आहे तद्वत 'हे गणपते, हे सर्व जग तुझ्या आधारावरच टिकून आहे' असें म्हटले आहे.

सृष्टीची निर्मिति अशी झालीच नाहीं या तत्वाच्या मुळाशी वेदान्ताप्रमाणें परब्रह्माचीच 'माया' नांवाची अदभुत शक्ति आहे. ही शक्ति जागी झाली की परमचैतन्यावर नामरुपात्मक देखावा दिसूं लागतो व तीच झोपी गेली की तो गुंडाळला जातो. (सर्व व्यक्त अव्यक्तात विलीन होते.)हे स्पष्ट करण्यासाठी ' हे गणपते, सर्व जग तुझ्यातच लय पावणार आहे' असें म्हटले आहे.

याचा विपरीत अर्थ घेऊन साधकानें परब्रह्म जाणण्याचे ध्येय विसरु नये म्हणून लगेच पुढचा उपमंत्र आहे. माणसाची सारी धडपड सुखाकडेच आहे; पण खरा आनंद न जाणल्यामुळें ती अज्ञानमूलक होते. म्हणून ' हे जग तुझ्याकडेच येत आहे' असे सांगितले आहे.

सृष्टीची निर्मिती पंचमहाभूतांच्या निर्मितीपासून सुरु झाली ; पंचमहभूतांच्या संयोगामधून वस्तू निर्माण झाल्या. 'सर्व इदं' मधे ही पांच तत्त्वे पण आली. हे सांगण्यासाठीं 'हे गणपते!पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश तूंच आहेस' असे म्हटले आहे.

वाणीचे प्रत्यक्ष नाद रुप म्हणजे वैखरी जी कानांनी ऐकू येते. त्याचेच सूक्ष्म, सूक्ष्मतर व सूक्ष्मतम रुप म्हणजे मध्यमा, पश्यंति व परा(-चत्वारी वाक्पदानि). ही सर्व लहरीमय रुपे आहेत. म्हणून 'हे गणपते, चारही वाक्-रुपे तुझीच आहेत' असे म्हटले आहे.

(क्रमशः) ●●●

# श्रीमाताजींबरोबर ध्यान



शूडि-कॅम्पमधील १९८२च्या सेमिनारमधें प.पू.श्रीमाताजींनी खालील प्रमाणें ध्यान करुन घेतले.

सर्वांनी डोळे मिटा. आता आपण पब्लिक प्रोग्रामधें जसे ध्यान करून घेतो तसे ध्यान करुं या.

डावा हात माझ्याकडे करून उजवा हात हदयावर ठेवा. हृदय हे आत्म्याचे स्थान आहे. आपल्या आत्मस्वरूपावर पूर्ण विश्वास ठेऊन पूर्ण श्रध्देनें आणि सूज्ञतेनें मनांत प्रार्थना करू या :

'' मी शुध्द आत्मा आहे. माझ्या चित्तात आलेला हा परमात्म्याचा प्रकाश
सर्व जगभर पसरूं दे''

आता उजवा हात पोटाच्या डावीकडील वरच्या भागावर ठेवा. हे तुमच्या मधील धर्माचे स्थान आहे. इथें मनांत प्रार्थना करुं या :

'' विश्व - निर्मल - धर्म सर्व जगभर पसरू दे. आमच्या धार्मिक आणि
नीतिमान जीवनाचा प्रकाश सर्व लोकांपर्यंत पोचूं दे त्यांना 'स्व'-रुप समजूं दे
आणि कल्याणकारी विश्व-धर्मा-मधून जीवनामधें उन्नत होण्याची प्रेरणा मिळूं दे.''

आतां उजवा हात पोटाच्या डाव्या बाजूच्याच खालच्या भागावर ठेवा आणि थोडा दाबा. हे शुध्द विद्येचे स्थान आहे. मी तुम्हाला या शुध्द विद्येचे सर्व ज्ञान दिले आहे आणि परमचैतन्याचे कार्य कसे चालते हे सर्व चक्रांवरच्या मंत्रांसकट समजावले आहे याचे चित्तात स्मरण करून मनांत प्रार्थना करुं या :

'' मला या शुध्द विद्येमधें पारंगत होऊं दे आणि कुण्डलिनी आणि चक्रांची
माहिती लोकांना देण्याची व त्यांची कुण्डलिनी जागृत करण्याची
क्षमता मिळूं दे. मला सहजयोगामधें परिपक्व बनूं दे''

आता उजवा हात पुन्हा डाव्या बाजूला पोटाच्या वरच्या भागावर ठेवा आणि प्रार्थना करा :

'' मी माझा स्वत:चा गुरु आहे. संसारात राहूनच मला माझे जीवन-
चरित्र उन्नत बनवण्यासाठीं माझ्यामधें प्रेम व दानत येऊं दे, सर्व
सहजयोग्यांबद्दल करुणा असूं दे. परमात्म्याच्या प्रेमशक्तीचे कार्य

मला सूक्ष्मामधेंही जाणवू दे जेणेकरून माझ्याकडे येणाऱ्यांना सहजयोगाचे
ज्ञान नम्रतापूर्वक मी देऊं शकेन''

आतां उजवा हात हृदयावर ठेवा. इथें तुम्हाला परमेश्वराचे ऋणी रहायचे आहे. ज्याच्या कृपेने तुम्हाला मातेच्या अपरिमित आनंद व क्षमासागरांत उतरता आले. म्हणून इथे मनात प्रार्थना करा :

''माझे हृदय विश्व सामावू शकेल इतके विशाल होऊं दे.माझ्या प्रेमामधून
परमात्म्याच्या नांवाचाच अविष्कार होत राहूं दे. माझ्या हृदयातून
परमात्म्याच्या प्रेमाचा निनाद होऊं दे''

आतां उजवा हात डावा खांदा आणि मान मिळतात तिथं ठेवा. ही डावी विशुध्दि. इथें प्रार्थना म्हणूं या :

'' मी स्वतःला अपराधी समजणार नाहीं कारण ती भावना असत्य आहे, हे मी
जाणतो. मी माझ्या दोषांकडे दुर्लक्ष न करतां ते सुधारण्याचा प्रामाणिक
प्रयत्न करेन. मी दुसऱ्यांचे दोष व चुका दाखवणार नाही., उलट ते दोष दूर
करण्यासाठीं त्यांना मदत करेन. माझी सामूहिकता विकसित हो ऊं दे
जेणेकरून समस्त सहजयोग्यांबरोबर माझे एक विशाल कुटुंब होईल. माझी
जाणीव विश्वव्यापक होऊंदे, आम्ही सारेजण एकाच आईची लेकरे आहोंत.''

आता उजवा हात कपाळावर आडवा ठेवा. हे क्षमेचे स्थान आहे. म्हणून मनांत नम्रतापूर्वक व निष्ठापूर्वक प्रार्थना करा :

'' मी सर्वांना, सर्व सहजयोग्यांना व जे सहजयोगांत आले नाहीत त्यांनाही, क्षमा केली.
माझ्याहून इतर सर्व सहजयोगी चांगले आहेत म्हणून मी त्यांचे दोष काढणार नाही.''

आतां उजवा हात डोक्याच्या मागच्या बाजूवर ठेवा आणि प्रार्थना करा :

'' श्रीमाताजी, आमच्याकडून आपल्या बाबतीत ज्या चुकीच्या भावना वा
समजुती आमच्या मनांत आल्या त्यांची आम्हाला क्षमा करा. आपल्याला
जाणण्यांत जो कमीपणा आमच्यामधें आहे त्याचीही आम्हाला क्षमा करा.
आपल्याला आमच्यामुळें जे त्रास होतो त्याचीही आम्हाला क्षमा करा''

आतां उजव्या हाताचा तळवा टाळूवर घट्ट दाबून सात वेळां घड्याळाच्या काट्याप्रमाणें फिरवा व मनांत प्रार्थना करा :

'' श्रीमाताजी, आपण आम्हाला आत्मसाक्षात्कार दिलात याबद्दल आम्ही आपले
अत्यंत ऋणी आहोंत. आपण या पृथ्वीतलावर अवतरण घेऊन आमच्यासाठीं इतके
कष्ट घेत आहात याबद्दल आम्ही आपले ऋणी आहोंत.''

आतां सर्वांनी ध्यानांत जा. ज्यांना गरम जाणवत असेल त्यांनी आपली डावी बाजू उचलून उजवीकडे खाली आणा. शांत बसा व दोन्ही हात माझ्याकडे करून व्हायब्रेशन्सकडे लक्ष द्या. आतां सात वेळां बंधन घेऊन स्वतःची कुण्डलिनी चढवून बांधून घ्या.

सर्वांना अनंत अशीर्वाद.

●●●



# चैतन्य मेळा
## महाराष्ट्र सेमिनार, शिर्डी २००३ (वृतांत)

प.पू. श्रीमाताजींच्या कृपेत यावर्षीचा सेमिनार अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी देवस्थानच्या परिसरात असलेल्या 'भक्त निवास' (५०० रुम्स) या जागेत दिनांक १२, १३ व १४ सप्टेंबर २००३ रोजी आयोजीत केला होता. सदर सेमिनारचा परिसर हा सदगुरु साईनाथ यांच्या मंदिराशेजारीच असल्याने सिमिनारच्या कालावधीत सर्व परिसरात प्रचंड व्हायब्रेशन्स जाणवत होती. सेमिनारचे शुल्क अतिशय अल्प असल्यामुळेच सेमिनारमध्ये सहजयोग्यांची उपस्थिती प्रचंड प्रमाणावर होती. सेमिनारसाठी सुमारे ४ हजार सहजयोगी महाराष्ट्रातील सर्व परिसरातून तसेच आंध्र प्रदेश, बंगलोर, हैद्राबाद, मध्यप्रदेश, गुजराथ, दिल्ली, उत्तरप्रदेश, गोवा इत्यादी राज्यातून आले होते.

<u>दिनांक १२ सप्टेंबर २००३</u>

सकाळी ९.३० पासून रजिस्ट्रेशन सुरु होते. दुपार पर्यंत सहजयोग्यांच्या झुंडी च्या झुंडी येत होत्या. सर्वांचे स्वागत कक्षात गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात येत होते. त्यानंतर सर्वांना त्यांना दिलेल्या निवासापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था युवाशक्ती करीत होती. मुळात शिर्डीच्या परिसरात असलेली श्रीसाईनाथांच्या सान्निध्यातील व्हायब्रेशन्स सेमिनारच्या ठिकाणी पाऊल ठेवल्यापासूनच जाणवत होती. रजिस्ट्रेशन करुन निवासाच्या रुममध्ये पाऊल ठेवल्याबरोबर राहण्याची उत्कृष्ठ व्यवस्था असल्याचे जाणवत होते. दुपारच्या जेवणाच्या मंडपात गेल्यावर तेथील व्यवस्था तसेच भव्यता सर्वांना जाणवत होती. शेजारीच मुख्य कार्यक्रमाचा मंडप २०० फुट लांब व १८० फुट रुंद अशा आकाराचा अतिशय सुरेख होता.त्यामध्ये पाऊल ठेवताच त्याची भव्यता जाणवत होती. समोर मोठे स्टेज, शेजारी म्युझिशियनसाठी स्वतंत्र स्टेज उभारलेले होते. सर्वजण दुपारचे जेवण घेऊन फ्रेश होऊन मुख्य मंडपात जमले.

दुपारी १२.०० च्या सुमारास सेमिनारची सुरवात श्री हरि जलान, श्री राजेंद्र पुगालिया , प्रा. अशोक चव्हाण, श्री सदाशिव शुक्ल व श्री सिध्दार्थ गुप्ता यांनी दिप प्रज्वलन करुन सेमिनारची केली. प्रा. अशोक चव्हाण यांनी सर्वांचे हार्दिक स्वागत केले तसेच सेमिनारचा आनंद घेण्यासाठी उत्सुक असलेल्या सहजयोग्यांना आपल्या सहभागाबद्दल धन्यवाद दिले.

दुपारच्या जेवणानंतर ३ च्या सुमारास सर्वजण हवनासाठी जमले. तीन महामंत्राच्या पवित्र मंत्रोच्चाराने हवनाची सुरवात झाली. त्यामध्ये आदिगुरु दत्तात्रयांची १०८ नावे घेऊन हवन झाले. त्यावेळी सर्वत्र प्रचंड प्रमाणात वाढलेल्या व्हायब्रेशन्स जाणवत होती. साधारण ६.३० च्या सुमारास हवन संपले. अर्ध्यातासाच्या चहा-पान नंतर परत सर्वजण संगीताच्या कार्यक्रमासाठी एकत्र जमले.

संगीत कार्यक्रमाची सुरवात प्रा. सहजयोगी गायक डॉ. राजेश, श्री दिपक वर्मा, श्री मुखीराम यांच्या चैतन्यमय जोशमय प्रसिध्द भजनाने झाली.त्यांना इकबाल खान , धनंजय धुमाळ यानी साथ दिली. सर्व गायक व कलावंत अत्यंत प्रसन्न मूडमध्ये होते. त्यांनी भजने गाऊन चैतन्यमय संगीताच्या धुंदीत नृत्य करण्यास सर्वांना उस्फुर्त भाग पाडले.संयोजक मंडळीही नृत्यात सहभागी झाली होती. धनंजय धुमाळ आणि मित्रपरिवार यांनी सादर केलेला 'सहजक्रांती' हा कार्यक्रम सर्वांना प्रेरणा देणारा ठरला ..कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे ११.०० वाजून गेले होते.

<u>दिनांक :-१३.९.२००३</u>

पहाटे ६.०० वा. च्या संतुर-फ़्लूटच्या मधूर आवाजाच्या साथीत सकाळचे सर्वांचे ध्यान झाले. त्यानंतर सकाळचा चहा- नाष्टा झाल्यावर सर्वजण परत १०.०० च्या सुमारास मुख्य पेंडॉलमध्ये जमले. श्री हरी जलान यांनी या चर्चा सत्राचे उदघाटन केले. त्यावेळी सेमिनारच्या स्मरणिकेचे प्रकाशन श्री राजेंद्र पुगालिया व श्री हरी जलान

यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी सामाजिक, राजकिय व इतर मंडळींनी वेळोवेळी सहजयोगाच्या कार्याला मदत केली त्या सर्वांचा गनर्निर्देश म्हणून सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यामध्ये प्रामुख्याने शिर्डी संस्थानचे वरिष्ठ पदाधिकारी, वेगवेगळे नगराध्यक्ष, डॉक्टर्स, व उद्योगपती उपस्थित होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी त्यांना जाणविलेली शिस्त, शांतता, स्वच्छता पाहून ते सर्व चकित झाले होते. श्रीमाताजी म्हणतात की 'सहजयोग हा समाजाभिमुख व्हायला पाहिजे ' या निमित्ताने सहजयोगाचे व सहजयोग्यांचे एक वेगळे चित्र या बाहेरील लोकांनी पाहिले.

सत्कारानंतर वेगवेगळ्या विषयांवर सहजयोगातील जेष्ठ मंडळींनी आपले विचार व्यक्त केले. नविन साधकांना या मधून बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. त्यावेळी श्री हरी जलान यांनी सहजयोगामधील प्रोटोकॉल्स यावर आपले विचार मांडले, प.पू.श्रीमाताजींनी सर्व सहजयोग्यांच्या फायद्यासाठी हे परमेश्वरी राज्याचे नियम बनवले आहेत, ते सहजयोग्यांनी तोडू नयेत. तसेच सदैव सहजयोगाच्या मर्यादेत असावे अशी आपेक्षा व्यक्त केली.

श्री राजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या प्रचंड सामार्थ्याची व शक्तीची पुनश: सर्व सहजयोग्यांना जाणीव करुन दिली. या मध्ये त्यांनी पुणे येथे चांदणी चौकापासून जवळच असलेल्या भुगाव परिसरातील नव्याने घेत असलेल्या जागेबद्दल सहजयोग्यांना माहिति दिली. तसेच पुढील काळात सहजयोग प्रचंड वाढणार असून अशा प्रकारे मोठया जागांची आवश्यक्ता भासणार असल्याचे सर्वांच्या निर्दशनात आणले. तसेच नुकत्याच प्रतिष्ठान पुणे येथे झालेल्या श्रीकृष्ण पूजा, १५ ऑगस्ट ध्वजवंदन सोहळा, राखी पोर्णिमा, तसेच नाशिक कुंभमेळा बाबत श्रीमाताजींशी झालेल्या प्रत्यक्ष बोलण्याबाबतची माहिती दिली.

त्यानंतर श्री सदाशिव शुक्ल नासिक यांनी अ-गुरु व कर्मकांड याबाबत आपले विचार मांडले. त्यामध्ये आजही काही अ-गुरु हे समाजाचे प्रचंड नुकसान करीत आहेत. निष्पाप साधकांना अ-गुरुंच्या कचाट्यातून सोडवणे हे सहजयोग्यांचे कर्तव्य आहे यावर त्यांनी भर दिला. तसेच जोपर्यंत कर्मकांडामधून सहजयोगी पूर्णपणे मुक्त होत नाही तोपर्यंत त्यांची प्रगती खऱ्या अर्थाने सहजयोगात होत नाही असे त्यांनी सुचवले.

अमरावतीचे डॉ. प्रताप उद्धवानी यांनी आपल्या हिंदी भाषणात सहज योगातील जे सुक्ष्म बारकावे आहेत त्याकडे त्यांनी सहजयोग्यांचे लक्ष वेधले त्यामध्ये गहनता व सुक्ष्मशरिराची रचना यावर भर दिला होता.

त्यानंतर अहमदनगर जिल्हा प्रमुख प्रा. अशोक चव्हाण यांनी सहजयोगावर आपले विचार मांडताना सांगितले की, प.पू.श्रीमाताजींना आदिशक्ती म्हणून ओळखणे वत्यानुसार वागणे हे सहजयोग्यांचे आद्य कर्तव्य आहे. तसेच श्रीमाताजींच्या प्रचंड शक्तीची जाणिव व सामर्थ्याची जाणिव सहजयोग्यांना करुन देताना आपण देखिल एक सहजयोगी आहोत याचे भान प्रत्येकाने सतत ठेवावे याचे स्मरण करुन दिले. आदिशक्तीच्या अवतरण काळामध्ये जन्मलेलो आपण, याचे मुल्य कशानेही होणार नाही असे सांगितले. येणारे पुढील हजारो वर्षे सहजयोगाचा हा ज्वलंत इतिहास लोक चिरकाल स्मरणात ठेवतील म्हणून या पवित्र वेळेमध्ये सहजयोगाचा जास्तीत जास्त प्रसार करण्याचे त्यांनी सहजयोग्यांना आव्हान केले . यानंतर पहिल्या सत्राची समाप्ति झाली.

दुपारच्या सत्रात श्री हरि जलान यांनी साधकांच्या समस्या, अडचणी व शंका यांची उत्तरे यांनी दिली . अनेक नविन साधकांच्या मुलभूत शंकाचे यावेळी निराकरण झाले. सदर कार्यक्रम साधारण ३ तास चालला होता.

चहा-पान नंतर संध्याकाळी ७.०० वाजता संगीत कार्यक्रमाची सुरवात झाली.सर्व संगित कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नाशिकचे धनंजय धुमाळ यांनी उत्कृष्ठपणे केले. सुरवातीला सहजयोगी कलाकारांनी काही भजने सादर केली आणि संगीताचे वातावरण तयार केले. त्यानंतर श्री धनंजय धुमाळ आणि सहकाऱ्यांनी '' सहज का सफर '' ही अफलातून नृत्य नाटिका सादर केली. सर्वांच्या मनाचा ठाव घेऊन गेली. कलीच्या वाद संवादातून नाट्याला गती येते व उत्तरोत्तर शिखर गाठते. त्यामुळे प्रेक्षकांची हे उत्कांठा वाढते. अतीशय मनोवेधक नाट्य,

सुंदर अभिनय यामुळे खुपच सुंदर झाले. सदर नाटकाचे लेखन, दिग्दर्शन, मुख्य अभिनय कु. लता धुमाळ यांनी केले होते. सुत्र संचलन राजेश मनुजा व सौ. धनेस्वर यांनी पाहिले. त्यास धनंजय धुमाळ यांच्या सुत्रसंचलनाची साथ लाभली होती..

दिनांक १४.९.२००३

सकाळी सहा वाजता सामूहिक ध्यानाने सुरवात झाली. त्यानंतर चहा-नाष्टा घेऊन सर्वजण १०.०० च्या सुमारास पेंडॉलमध्ये जमले. त्यामध्ये डॉ.आनंद हुले यांनी सहज संकृती या विषयावर आपले विचार मांडले. तसेच सहजयोग्यांची जबाबदारी सांगताना प्रत्येकाने जीवनातील प्रत्येक क्षण सहजयोगासाठी जगला पाहिजे. आपल्या जीवनातील सर्व काळज्या ,चिंता श्रीमाताजी घेतात हे सांगितले. त्याचवेळी सहजयोग ध्यान पद्दतीने उपचार करण्याची माहिती दिली. त्यात ३ नाड्या गुणिले ७ चक्रे बरोबर २१ मुळ आजार आहेत. तसेच ध्यानाचा उपयोग करुन चक्रे कशी ठिक होतात ते सांगितले.

त्यानंतर गोवा राज्याचे लिडर श्री दिलीप नलगिरकर यांनी आपले विचार अत्यंत परखडपणे प्रभावी पणे व्यक्त केले. त्यात त्यांनी सांगितले की, प्रोटोकॉल बाबतची अतिशयोक्ति, चित्त बाबतचे गैरसमज सांगताना भौतिकातील प्रसंगातील उदाहरणे देऊन सर्वांना हसवले. तसेच जगात आता दोनच जाती आसून एक म्हनजे सहजयोगी व दुसरी म्हणजे नॉन सहजयोगी आहे. तसेच आपल्या व्हाईड मधिल पोकळी भरल्याशिवाय कुंडलिनी वर जात नाही ती पोकळी फक्त प्रेमशक्तीनेच भरली जात असल्याने श्रीमाताजींना आईचे प्रेम देण्यासाठी हा जन्म घेतला. ''चुका ध्यान गयी जान '' सांगताना ध्यानाचे महत्व विषद केले.

त्यानंतर स्थानीक कलावंतांची भजने सादर केली. शेवटी वनदेवीचे डॉ. विश्वजित चव्हाण यांनी वनदेवी औषधे व उपचारांची माहिती दिली.

दुपारच्या जेवणानंतर ४.३० च्या सुमारास गणेशपूजेसाठी सर्वजण एकत्र जमले . त्यावेळी स्टेजवरचे डेकोरेशन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. विषेशत: शिपल्याच्या आकारात कलेला गणपती सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. स्टेजवर फुलांची भव्य आरास केली होती.वाशीचे श्री दुधाणे यांच्या मार्गदर्शनाने पुजा सुरु झाली. पुजेच्या सुरवातीला स्टेजवर असलेल्या रिकाम्या सिहासनावर ठेवण्यासाठी श्रीमाताजींचा फोटो व चरण स्टेजवर स्वागत गीत म्हणत आणण्यात आले तो प्रसंग प्रत्यक्ष श्रीमाताजीचे स्टेजवर आगमन होते त्यावेळच्या प्रसंगाप्रमाणे हूबेहूब वाटत होता. त्यावेळी प्रत्यक्ष श्रीमाताजींच्या अगमनाप्रमाणे सर्वजण जागेवर उभे राहिले होते.

पुजेची सुरवात २१ लहान मुलांच्या कडून झाली त्यावेळी सुरवातीला गणेश अर्थवशीर्श, त्यानंतर सर्व लिडर्स च्या हातून पूजा झाली. पुजा अत्यंत शांतपणे, निवांतपणे पुर्ण श्रद्धेने झाली. पुजेनेंतर श्री दिलीप नलगिरकर यांनी सर्वांचे आभार मानून सेमिनारची सांगता झाल्याचे सांगितले.

ह्या सेमिनारसाठी अहमदनगर जिल्ह्यांतील सर्व कार्यकर्त्यांनी व युवाशक्तीने फार मेहनत घेतलेली होती. तसेच जेवणाचा पेंडॉल, मुख्य कार्यक्रमाचा पेंडॉल व राहण्याची व्यवस्था जवळ एकाच जागेत होती. तसेच राहण्यासाठी सर्वांना सर्व सोयीयुक्त बंधिस्त खोल्या होत्या. तसेच जेवणाची- पाण्याची व्यवस्था सुंदर होती. डेकोरेशन हे श्रीरामपूर- नाशिकच्या युवाशक्तीने अत्यंत सुंदर केले होते.सेमिनारसाठी प्रसिध्द सहजयोगी गायकांना आमंत्रित केले होते. माईक व्यवस्था उत्तम होते. मधल्या वेळात नवीन सहजयोगी होतकरु गायकांना गाण्याची संधी दिली गेली. सर्व संगीत कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री धनंजय धुमाळ यांनी पाहिले.

पहिल्या पासून सहजयोग प्रसार- प्रचारामध्ये सतत अग्रभागी असलेल्या ह्या अहमदनगर जिल्ह्यातील सहयोग सेमिनारचे आयोजन, नियोजनाबाबत एक वेगळाच ठसा निर्माण केला. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीरामपूरचे श्री नितीन पवार यांनी केले.

●●●

# गौतम बुध्द

( इ.स. पूर्व ६२३ मध्ये जन्म-इ.स. पूर्व ५४३ मध्ये निर्वाणपद प्राप्त केले).

आषाढी पौर्णिमेच्या दिवशी कपिलवस्तूनगरीचा राजा शुध्दोदन दोन राण्यासह उत्सवात सहभागी झाला होता त्यावेळी थोरली महाराणी महामायादेवीला आगळाच उत्साह आला होता. उत्सव संपल्यानंतर महामायादेवीला आपल्या सुवर्ण मंचकावर गाढ झोप लागली. झोपेत तिला विलक्षण स्वप्न पडले. - त्यामध्ये आकाशातून काही देवदूत आले व त्यांनी सुवर्ण मंचकासह राणीला हिमालयातील अती उंच जागेवर नेलं. अप्सरांनी तीला मानस सरोवरात स्नान घालून शुभ्र वस्त्र नेसायला दिले. समोरचा डोंगर सोन्याचा झाला व त्यातून एक भला मोठा पांढरा हत्ती बाहेर आला. त्या हत्तीला सहा दात होते. त्यानं सोंडेत कमलपुष्प घेतले होते. त्याने राणीला तीन प्रदशना घातल्या आणि आपले रुप बदलून देवदूत झाला. देवदूत हात जोडून राणीला म्हणाला, '' माते मी तुझ्या पोटी जन्म घेणार आहे. देवांच्या संदेशाने आजचा मुहुर्त मला लाभला आहे तो पहा, त्याचवेळी आकाशातून एक तारा तुटून खाली आला, प्रकाशरुपाने मी तुझ्या उदरात......'' बोलता बोलता देवदूत गुप्त झाला. राणीला जाग आली तिने हे स्वप्न राजा शुध्दोदनाला सांगितले.

राजाने दुसऱ्या दिवशी प्रख्यात भविष्यकारांना बोलवून हे स्वप्न सांगितले. त्यांनी सांगितले की,'' राजा पूर्वपुण्य ज्यांचे त्यांनाच अवतारी पुरुष जन्म देण्याचा अधिकार प्राप्त होत असतो. राणी मायादेवीला तो अधिकार लाभला आहे. आता तिच्या पोटी एक दिव्य पुण्यात्मा जन्म घेणार आहे.'' तो महापुरुष जर राजवैभवात नांदला तर महापराक्रमी सम्राट होईल, नाहीतर तो विरक्त संन्यासी होऊन जगाला खऱ्या सुखाचा मार्ग दाखवील.त्यानंतर राणी लवकरच गर्भवती राहिली.

बाळांतपणाच्या वेळी राणी राजाला म्हणाली की मला माहेरी 'देवदह' गावात जावसं वाटते. कपिलवस्तूहून सुमारे दोन किलोमिटर अंतरावर गेल्यावर राणी विश्रांतीसाठी जवळच्या लुम्हिनी नावाच्या सुंदर उपवनात थांबली. त्याचवेळी तिला प्रसूतीकळा सुरु झाल्या. तिने शालवृक्षाच्या फांदीला धरुन उभी राहिली. थोड्याचवेळात तिने एका दिव्य



बालकाला जन्म दिला.त्यावेळी एका-एक विजेचा लखलखाट झाला आणि आकाशातून पुष्पवृष्टी झाली.त्यावेळी ऋषिमुनींनी डोळे उघडले, त्या भागातील अंधळ्यांना दृष्टी आली, बहीऱ्यांना ऐकु येऊ लागले, मुके बोलके झाले आणि पंगू पळत बाळाच्या दर्शनाला आले. राणीला परत कपिलवस्तु राजधानीत नेण्यात आले.

पाचव्या दिवशी बाळाचे नाव ठेवले, 'सिध्दार्थ' .राजपुत्र सिध्दार्थ हळू हळू वाढू लागला. त्याच्या सर्व शिक्षणासाठी गुरु ठेवले. भाषा, गणित आणि धर्मशास्त्रामध्ये त्याची खूप प्रगती झाली तसेच घोडदौड, युध्दकला आणि राजनीती या विषयात तो तरबेज झाला.

कपिलवस्तूनगरीत एकदा कौडिण्य नावाचे ऋषी आले होते. त्यांना राजपुत्र सिध्दार्थाने विचारले की,''शुध्द कशासाठी करायचं? दुसऱ्यांना मारून आपण मोठेपणा मिळवणं यात खरं समाधान मिळते का? जग म्हणजे जगणं......'' त्याचवेळी सर्वांच्या लक्षात आले की हा राजवैभवात राहणार नाही. गौतम नेहमी कसल्यातरी विचार-चितनात मग्न असायचा. समाधी लाऊन तो ध्यानस्थ शांत बसायचा.

राजपुत्र सिध्दार्थ बागेत बसला असता हंस पक्षांचा थवा आकाशातून उडत होता. त्यातील एक हंस शरीरात बाण लागून खाली पडला. त्याला उचलून आपल्या शेल्याने त्याची जखम बांधली आणि बाण मारणाऱ्या देवदत्त या आपल्या चुलत भावाला म्हणाला की,'' जीवन हे जगण्यासाठी असतं. आपण जसं जगलं पाहिजे तसंच दुसऱ्यांनाही जगविलं पाहिजे! जीवनाचा खरा अर्थ तोच आहे!''

राज्यात ध्यान्यरोपणाचा उत्सव चालू होता. त्यावेळी पेरणीच्यावेळी बैलांच्या पाठीवर आसुडाचे फटके मारले जात होते, ते दृष्य पाहून तो म्हणाला, '' आपल्या पोटासाठी माणसानं या बैलांच्या पाठीवर मारावं हे कसलं जीवन!'' त्यानंतर झाडाखाली बसला असता मुन्यांची रांगपाहून एक सरडा आला तो मुंग्यांना खाऊ लागला, नंतर बिळातून एक साप आला त्याने सरड्याला खाल्ले, आभाळातून एक घार आली तीने सापावर झडप घातली आणि सरडयासह सापाला घेऊन गेली हा देखावा पाहून विषण्ण मनाने तो म्हणाला,' यालाच जीवन हे नाव आहे का?

राजपुत्र सिध्दार्थ कशातही रमत नाही हे पाहून राजा शुध्दसेन बैचेन झाला होता. त्याच्या पायात बेडी अडकवल्यावर सर्व ठीक होईल असे ठरवून राज्यात सौदर्य उत्सव व नंतर स्वयंवर योजले. देवदह गावच्या दण्डपाणी राजाच्या सुकन्या यशोधराच्या गळ्यात गौतमानं आपल्या गळ्यातील नवरत्नाची माळ घातली. नंतर सर्वात जास्त लांब बाणसोडून स्वयंवर जिंकला त्यावेळी यशोधराने वरमाळा गौतमाच्या गळ्यात घातली.

गौतमाच्या सुखासाठी राजाने उन्हाळा,पावसाळा, हिवाळा सर्व ऋतू सुखकारक होतील असा विलक्षण बदल होणारा 'प्रमोद भवन' हा प्रसाद तयार केला. तसेच अवतीभवती अत्यंत सुंदर बाग बनवली. त्यात सुखाच्या शिखरावर सिध्दार्थ यशोधराच्या सहवासात स्वर्गीय सुखाचा आनंद उपभोगीत होता.

एके दिवशी दुपारच्या भोजनानंतर सिध्दार्थ रत्नमंचकावर निद्रिस्त असताना कोपऱ्यातील वीणेच्या सुरेल तारा वाऱ्याच्या झुळकेने छेडल्या गेल्या. त्यातून बोल निघाले, गौतमा ऊठ, जगाच्या दु:खाकडे पहा. येथील मोहमया पासून दूर हो. जगाच्या कल्याणासाठी जीवन समर्पण कर'' तो ताडकन उठला आणि म्हलाला, ''प्रिये मला हे सुख सलतं आहे जगाचं सुख मला पाहिले पाहिजे. त्यांचे दु:ख दुर केले पाहिजे, मला बाहेर गेलेच पाहिजे.मला हा मोहमायेचा गुंता सोडवलाच पाहिजे.

युवराज राजधानीत फिरण्यासाठी बाहेर पडला त्यावेळी एक वृध्द जर्जर म्हतारा रथाच्या पुढे आला.त्याच्या शरीराची झालेली स्थिती पाहून सिध्दार्थ म्हणाला ''म्हणजे प्रत्येक माणसाला म्हतारपण येत असंत का? त्यानंतर तो परत प्रमोद भवनात आला. त्याला सर्व सुखसोयी पाहून तो मनाशीच म्हणाला की,''अरेरे, हे सारं क्षणभंगुर आहे तर! त्या नंतर तो रात्रंदिवस चिंतन करु लागला.

एके दिवशी तो राजधानीत पायी वेष बदलून फेरफटका करीत असता, त्याला सगळीकडे गर्दी, गोंधळ, गोंगाट, मारामारी पळापळी दिसली. एका ओट्यावर एक माणूस वेदनेने विव्हळत-कण्हत पडलेला दिसला. त्याच्या अंगावर माशा घोंगावत होत्या. भोवती माणसे रडत होती तो मरणाच्या दारात असल्याचे त्याला समजले. त्यानंतर त्याने एक प्रेत यात्रा बधितली त्यावेळी त्याच्या मनात आले की, आपण देखिल यातून जाणार अरेरे! पुढे एका झाडाखाली एक सन्यासी मुंडन करुन भगवे वस्त्र नेसून बसलेला दिसला. त्याने जगातील दु:खाला, वासनामय जीवनाला कंटाळून सन्यास घेतलेला होता.प्रमोद भवनाबाहेरील दैन्य-दु:खांच ते दर्शन घेऊन युवराज परत आला. म्हतारपण, आजारपण आणि मरण हे कोणालाच चुकणार नाही.इंद्रियांचे सुख भोगण्यात खरं समाधान नाही. सर्वांना शाश्वत सुख लाभावं, आरोग्यसंपदा लाभावी, सर्वांचे कल्याण व्हावं, यासाठी आपण काय केलं पाहिजे याचा तो सतत विचार करु लागला.

काही दिवसांनी पत्नी यशोधरा गरोदर झाली. तिनं सुंदर बालकाला जन्म दिला. त्यावेळी तो बागेत ध्यान-चिंतनात गुंग होता. त्याला पुत्रजन्माची वार्ता कळली त्यावेळी तो म्हणाला,'' हे एक आणखी बंधन! ही शृंखलाच! हा राहूल ! आता रेशमाची गाठ पक्की झाली ! वाहवा रे मायापाश ! बाळाचं नाव ठेवा -राहूल !''

कोलियाराज्याशी युध्द करण्याबाबतच्या सभेतील निर्णयास सिध्दार्थाने विरोध केला. त्यामुळे संघाच्या प्रतिनीधींनी सांगीतले की, ''ज्याला राजकरणात रस नाही, युध्दाला विरोध करणाऱ्याने देश सोडावा, संन्यास घ्यावा आणि शांतीचा उपदेश करीत हिंडावे।'' संघाच्या आध्यक्षांनी सिध्दार्थाला ही शिक्षा दिली. संघाचा तो आदेश सिध्दार्थाने मान्य केला. सिध्दार्थाने राजा-राणीची समजूत काढली चिमुकल्या राहूलला प्रेमभरानं पाहिले आणि यशोधराला म्हणाला, संघाच्या ठरावाने माझ्यावर उपकारच केले. प्रपंच-व्यवहाराचे हे बंध रेशमाचे तोडून मी आता संन्यास घेणार. हा देश सोडून सत्य-अहिंसेचे कार्य, एक नवा मानवधर्म जगाच्या कल्याणासाठी करणार'' यशोधराने ह्या कार्याला माझी परवानगी असल्याचे सांगीतले.तसेच जीवात जीव असेपर्यंत सासू - सासऱ्यांची सेवा करील. राहूलला सांभाळील असे तीने

सांगितले.

मध्यरात्री सिध्दार्थाला जाग आली. त्याने यशोधराच्या बाळांत खोलीत जाऊन बाळाला व तीला पाहिले आणि आश्वशाळेत जाऊन सारथी छत्रा सोबत कंथक घोड्यावर स्वार झाला. नदीतीरी भारद्धाज ऋषींच्या आश्रमातील शिष्यांकडून भगवी वस्त्रे घेतली. सर्व अलंकार छत्राकडे दिले आणिआपल्या डोक्यावरील केस कापले आणि तो मनाशी म्हणाला,'' माझ्या मनातील इच्छा जर पूर्ण होणार असेल तर हे माझे केस हवेत तरंगत राहतील!'' आणि केस हावेत सोडले. ते केस हवेत तरंगत तरंगत दूर गेले. स्नान करुन गौतमाने भगवे वस्त्रे परिधान केले.

भारद्धाज मुनींच्या आश्रमात जाऊन विधिपुर्वक संन्यासाची दिक्षा घेतली.नंतर गौतम वैशाली नगरीत गेला तिथे 'आडारकालाम' नावाच्या विद्धान पंडीत होता. त्याचेकडे तिनशे शिष्य आध्यात्माचे शिक्षण घेत होते. गौतमाने त्यांचे शिष्यत्व पत्कारले आणि ध्यानधारणा, मनोनिग्रह, समाधीमार्ग,सांख्याशास्त्र वगेरे ज्ञान घेतले.रामपुत्र उद्रक नावाच्या एका विद्धानाचे शिष्यत्व पत्कारुन त्याच्याकडून योगशास्त्राचा गाढा अभ्यास केला. त्यामुळे गौतमाचे तेज खूपच वाढले.

गुगुऋषींच्या आश्रमातही गौतम काही काळ राहिले. त्याठीकाणी स्वर्गप्राप्तिसाठी काही तपस्वी घोर तपस्या करीत असल्याचे त्याने पाहिले. त्यांची तपस्या केवळ स्वत:च्यास्वर्गप्रातीसाठी असल्याने गौतमाला तो मार्ग पसंत नव्हता. त्याला जगाच्या कल्याणासाठी शाश्वत सुखाची आस होती.

गयाशीर्ष पर्वतावर एका निबिड आरण्यात गेला.त्याठिकाणी उरुबिल्व नावाच्या तपोवनात कौंडिण्यादि पाच ऋषी जगाच्या कल्याणासाठी तपश्चर्या करीत होते. ते ठिकाण खूपच आवडल्यामुळे गौतम त्याठिकाणी तपश्चर्येला बसला.उरुबेला तपोवनात एका मोठया वटवृक्षाखाली बसून सुमारे सहा वर्षे गौतमान अत्यंत खडतर अशी तपश्चर्या केली. अन्न-पाणी वर्ज्य केल्याने गौतमाचा देह म्हणजे हाडांचा सापळा उरला होता. त्यासुमारास सेनानी गावातील सुजाता नावाची एक स्त्री हातात पूजा साहित्य घेऊन नवस फेडायला आली होती. तीने नैवेद्यासाठी आणलेली खीरीची वाटी गौतम प्याला.त्याबरोबर त्याच्या देहाभोवती एक दिव्य वलय तयार होऊन त्याचा देह सुंदर तेजपूंज झाला.

निरंजन नदीच्या काठावरुन तो फिरत असता त्याला एका गवत कापित असलेल्या माणसाने आठ मुठी गवत आसनासाठी दिले. ते घेऊन तो गयातीर्थाजवळ एका पिंपळाच्या झाडाखाली त्या आठमुठी गवताचे आसन करुन त्यावर आपली बैठक घातली आणि प्रतिज्ञा केली, '' अखिल मानवांच्या कल्याणासाठी खऱ्या सुखाचा मार्ग सापडल्याशिवाय या आसनावरुन उठायचंच नाही. काहीही होवो!'' योगमार्गाने समाधीलाऊन गौतम बसला असता ध्येयापासून विचलीत करण्यासाठी काम,क्रोध,लोभ,मोह, मद मत्सर या षड्रिपूंनी त्याच्यावर अनेक प्रकारांनी हल्ले केले पण तो त्यापासून विचलीत झाला नाही.

वैशाखी पोर्णिमेच्या रात्री ध्यान-चिंतनात मग्न असताना एकाएकी एकदिव्य ज्योत एकदम गौतमाच्या शरीरात शिरली. गौतमाच्या अंतरंगात भव्य प्रकाश पडला. गौतमाच्या अंगावर आनंदाचे रोमांच्य उठले. त्याची आत्मज्योत शहारली. थरारली. गौतमाला पाहिजे होतं तेज्ञान मिळालं. तो ज्ञानी म्हणजे बुध्द झाला.गौतमाला दिव्यज्ञान मिळालं. तो बुध्द झाला.ज्या पिंपळाखाली त्याला हा साक्षात्कार झाला त्या बोधिवृक्षावर आणि त्याच्या खाली बसलेल्या दिव्य तेजाच्या गौतम बुध्दावर आकाशातून गंगेच्या पाण्याचे तुषार पडले. देवांनी फुले उधळली.

बोधिवृक्षाखाली गौतमाला मानवी सुखाच्या ज्या धर्माचं दिव्य ज्ञान झाले त्यानुसार माणसाने अतिविलास आणि भयंकर आत्मक्लेश यातील मधला मार्ग स्विकारला पाहिजे म्हणजेच अष्टांग मार्ग । त्या श्रेष्ठ मध्यम -मध्यमचा अंगीकार म्हणजेच शाश्वत सुखाचा खरा मानवी धर्म होय. त्यानुसार १) सत्यनिष्ठष २) सदाचरण ३) विश्वबंधुत्व ४) मनोनिग्रह ५) अहिंसा ६) भूतदया ७) निष्काम कर्म आणि ८) आत्मोन्नती (निर्वाण) अशी आठ तत्वे (अष्टांग धर्म ) माणसानं जर पाळली तर त्याच्या दु:खांचा परिहार होईल आणि त्याला खऱ्या शाश्वत सुखाचा लाभ होईल.

अशा नव्या मानव धर्माचं दिव्य ज्ञान लोकांना त्यांच्या (पाली)भाषेत समजून द्यायचे बहुजन हिताय । बहुजन सुखाय । असा हा मानवधर्म सर्वत्र पसरुन द्यायचा.असा भगवान बुध्दानं निश्चय करुन त्या बोधिवृक्षाखालून उठला. त्यानंतर गयाक्षेत्र सोडून भगवान गौतम बुध्द थेट वाराणशी (काशी) तीर्थावर गेले. तिथे कौण्डिण्य, अश्वजित, बाष्प, महानाम आणि भद्रक या पाच महातपस्व्यांची भेट घेतली

गौतमाने त्यांना उपदेश केला की, ''यज्ञयाग, हिंसा आणि भेदभाव सोडून सर्वांनी सत्यानं, संयमनं, बंधुभावानं रहावं मनशुध्दी करुन निर्भयतेने वागावं, अष्टांग धर्माचं पालन करावं '' हा धर्माचा उपदेश त्यांना पटला. ते पाचही जण त्याचे शिष्य बनून ते बुध्द भिक्षू बनले आणि भगवान बुध्दाबरोबर धर्मप्रसार करित फिरु लागले. त्यानंतर त्यांना हजारो शिष्य मिळाले.

वाराणसी नगरीतील यश नावाच्या श्रीमंताच्या मुलाची भेट झाली आणि त्यांचे सर्व कुटुंबच बौध्द भिक्षूक झाले. तसेच उरूबेल नगरीतील काश्यप  नावाच्या पंडित व त्यांचे पाच बंधू यांचे हजारो शिष्य होते. त्यांना मुचलिंद नावाचा एक दुष्ट नागराजा त्रास देत असे. भगवानांनी त्याची भेट घेतली आणि त्याचे मतपरिवर्तन होऊन त्याने दुष्टपणा सोडला.बिध्सत्त्व राजगृह राजधानीत गेले तिथे बिंबिसार राजाने आपलं वेणुवन नावाचं उद्यान बुध्द भिक्षूंच्या निवासासाठी मोठा विहार बांधून दान दिले. त्यानगरीत उपतीष्य उर्फसारिपुत्त आणि कोलित उर्फ मोदगल्यान नावाचे दोन महापंडीत होते त्यांनी बुध्दांच नव ज्ञान ऐकून ते दोघे पंडित प्रभावी होऊन त्यांनी बुध्दधर्म स्विकारला. ते पुढे बुध्दांचे आवडते शिष्य झाले.

संघ व्यवस्था हे बौध्दधर्माचे वैशिष्ठपूर्ण अंग होते. त्यात मुंडन करुन पिवळे किंवा भगवे वस्त्र अंगावर वापरून भिक्षा मागुनच भोजन करावयाचे, तसेच अरुंद जागेवरच झोपायचे असे नियम होते. बुध्दांचा अत्यंत साधा उपदेश असल्याने हजारो लोक या धर्मात आले. बुध्दधर्माची दिक्षा देताना भगवान स्वतः आपल्या शिष्याला ''एहि भिख्खू'' एवढच म्हणायचे.पण पुढे शिष्य परिवार वाढत चालला,.व्याप वाढत चालला तसे बुध्दांनी आपल्या प्रमुख अनुयायांना दीक्षा देण्याची परवानगी दिली दीक्षा देताना ते पुढील मंत्र म्हणवून घेत- '' बुध्दं सरणं गच्छामि । संघं सरणं गच्छामि ।  धम्मं सरणं गच्छामि । याचा अर्थ मी बुध्दाला, संघाला, धर्माला शरण जात आहे !

भगवान बुध्द फिरत फिरत आपल्या कपिलवस्तू राजधानीत गेले. तिथं त्यांनी आपल्या माता -पिता कडून भिक्षा घेतली. ते दोघे बुध्दाचे उपासक बनले. पत्नी यशोधरा आणि पुत्र राहूल हे दोघे बुध्द भिक्षूक बनले.

वयाच्या पस्तिसाव्या वर्षी राजकुमार सिध्दार्थाने राजविलास, घरदार आणि प्रपंच सोडून आपल्या जीवनाला नवं वळण लावून ज्ञानप्राप्ति झाल्यावर धर्माचा प्रसार करीत धर्म वाढवला . आता बुध्दांना ऐंशी वर्षे पूर्ण झाली. भगवान बुध्द आता म्हातारे झाले. ते बिल्वग्रामा- जवळच्या तपोवनात त्यांनी मुक्काम केला थोडे बरे वाटल्यावर वैशालीहून कुशीनगराकडं निघाले. वाटेत पावानगरीत  कुश नगरजवळच्या शालवनात त्यांचा शालवृक्षाखाली बिछाना घातला. त्यांनी आनंदा नावाच्या शिष्या जवळ बोलवून आपल्या सर्व शिष्यांना बोलावण्यास पाठवले. ती वैशाखी पौर्णिमेची रात्र होती त्यांनी सर्वांना संदेश दिला की,''ज्या हेतूने मी माझ्या जीवनाला नवीन वळणं लावून घेतलं तो हेतू आता पुर्ण झाला आहे. आपल्या धर्माचा प्रसार जगभर करा. कितीही अडचणी आल्या तरी शांती ढळू देऊ नका. अष्टांग मार्ग अवलंबा.'' शेवटचा असा उपदेश करुन ते म्हणाले जुन्या भिक्षूनी नविनांना ''आपुसो '' असा आशीर्वाद द्यावा. तर नविनांनी जुन्यांना ''भन्ते'' असा वंदनीय शब्द वापरावा. एवढे बोलून  त्यांनी ''आपूसो'' शब्द उच्चारला आणि मान टाकली.

त्यांचा जन्म वैशाखी पौर्णिमेला शालवृक्षाच्या खाली झाला होता. त्यांना ज्ञानप्राप्ति पिंपळाच्या बोधीवृक्षाखाली वैशाखी पौर्णिमेलाच झाले आणि निर्वाणपद देखिल शालवृक्षाखाली वैशाखी पौर्णिमेलाचा झाले. त्यामुळे ही वैशाखी पौर्णिमा ही सर्वांची पुण्य पावन पौर्णिमा बनली. त्यांचा देह सहा दिवस ठेवला होता सातव्या दिवशी चंदनाच्या चितेवर त्यास अग्नीसंस्कार करुन त्यांची अस्थीचे आठ भाग केले आणि राजगृह, वैशाली, कपिलवस्तू, अल्पकल्प, वेठद्वीप, रामग्राम, पावा आणि कुशीनगर या ठिकाणी ठेवण्यात आले. तेथे स्तूप उभारण्यात आले.

भगवान बुध्दांच्या वचनांचा तीन भागात संग्रह केला. त्याला त्रिपिटक असं नाव दिलं गेल.

१-त्याच्या आयुष्यातील विनयशील सदाचरांच्या घटना आणि त्यांची उदबोधक वचने(विनयपिटके)

२- भिक्षू-भिक्षूर्णींच्या नियमांचे सूत्रपिटक

३-बुध्द तत्वज्ञानाचा संग्रह

सहज समाचार

## निर्मल नगरी पुणे भूमिपूजन समारंभ









रविवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजी पुणे परिसरातील भूकूम गावाजवळच्या खाटपेवाडी या ठिकाणी सकाळी ११.०० भूमिपूजन समारंभ प.पू.श्रीमाताजींच्या आशीर्वादात संपन्न झाला. सदर अंतर हे चांदणी चौकापासून १० कि.मी. आहे. पुण्यातील सध्याची जागा पूजेच्यावेळी कमी पडत असल्याने तसेच पुढील काळातील प.पू.श्रीमाताजींची साकार पुजेसाठी सदर निसर्गरम्य परिसरातील ११ एकर जागा खरेदी करण्यात आली आहे.

कार्यक्रमासाठी प्रसिध्द मान्यवर आमदार कुमार गोसावी, तुकारामबुवा हगवणे, सरपंच शांताराम इंगवले, संजय माझिरे, सौ शांताबाई इंगवले,भानूदास पानसरे तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्वांचे स्वागत श्री चंद्रकान्तजी यांनी केले. त्यानंतर कोनशिलेचे उद्घाटन आमदार श्री गोसावी यांच्या हस्ते झाले. त्यानंतर प्रत्यक्ष भूमिपूजनाचा कार्यक्रम झाला त्यावेळी प्रथम श्री कुमार गोसावी यांनी कुदळीने जमीन खोदली. पाठोपाठ सर्व मान्यवरांनी भूमिपूजन केले. सदर प्रसंगी माईकवर तीन महामंत्र, गणपती अथर्वशीर्ष, भूमिमातेचे मंत्रोचार चालू होता.

त्याप्रसंगी श्री राजेंद्र पुगालिया म्हणाले की,''श्रीमाताजींनी सहजयोगाच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार केला आहे. भारतात धरमशाळेमध्ये एक शाळा चालवली जाते. तसेच विधवा, निराधार महिलांसाठी दिल्लीत एक संस्था आहे. सहजयोग माध्यमातून अनेक रोग बरे झाले आहेत, आपल्या गावाचे भाग्य म्हणूनच हे पवित्र कार्य या गावात होणार असून आमदार श्री कुमार गोसावी यांनी जागेपर्यंत डांबरी रस्ता करून देण्याचे अश्वासन दिले आहे.

आमदार श्री कुमारभाऊ गोसावी यांच्या भाषण ऐकताना त्यांची प.पू. श्रीमाताजींवर अत्यंत श्रद्धा असल्याचे जाणवत होते. ते म्हणाले की, १०-१२ वर्षापूर्वी श्रीमाताजींचा दोन-तिन तास सहवास लाभला होता. त्यावेळी मी फक्त सरपंच होतो. श्रीमाताजींनी माझ्या डोक्यावर त्यावेळी हात ठेवून मला आशिर्वादीत केले होते. त्यामुळेच आज मी आमदार आहे. निसर्गरम्य परिसरातील रामनदीच्या सानिध्यात असलेल्या या जागेला लवकरच श्रीमाताजींचा पदस्पर्श होणार असून हे या पंचकोशितील सर्वांचे भाग्य आहे . भविष्यात या ठिकाणी जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेक लोक येतील. आपण सर्व स्थानिक लोकांनी या शुभ कार्याला हातभार लावला पाहिजे.

त्यानंतर इतर मान्यवरांची भाषणे झाली. शेवटी कर्नल माने यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहिर केले. कार्यक्रमानंतर सर्वांनी निसर्गाच्या सानिध्यात महाप्रसादाचा आनंद घेतला.

सदर जागेकरीता देणगी गोळा करण्याचे काम सुरू असून जागेतील डेव्हलपमेंट साठी मोठ्या रक्कमेची आवश्यक्ता आहे. तरी सर्व सहजयोगी बंधु-भगिनींना नम्र आवाहन करण्यात येते की, या ऐतहासिक प्रोजेक्टला सढळ हाताने देणगी देऊन आपणही भाग्यवान व्हा. देणगी चेकने/ डी.डी.ने देताना,'' विश्व निर्मल धर्म सोसायटी'' या नावाने चैतन्य लहरी पुणे पत्यावर (अनुक्रमणिकेत पत्ता दिलेला आहे.) पाठवावी.

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करूनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥







# चैतन्य मेळा, महाराष्ट्र सेमिनार, शिर्डी २००३









# निर्मल नगरी पुणे, भूमिपूजन समारंभ




